cmyk

## संपादकीय

### शालेय सुविधांमध्ये तडजोड नसावी !

एकीकडे महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्ष काही अस्मितांचे विषय ऐरणीवर आणून आंदोलने करण्याची भूमिका स्वीकारत असताना दुसरीकडे सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या शिक्षण क्षेत्राच्या विषयाकडे लक्ष द्यायला मात्र कोणालाच फुरसत नाही, असे विदारक चित्र दुर्दैवाने समोर आले आहे. सध्या सुरु असलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना राज्यातील शालेय शिक्षणाबाबत जी स्थिती मांडली आहे .


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–७७ | शनिवार, दि.१२ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये



१२ वी सायन्स उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना बी. टेक. (फूड टेक.) तसेच बी.एस्सी. (ऑनर्स) ॲग्रीकल्चर पदवी घेवून सर्व क्षेत्रात हमखास १००% नोकरीची संधी.

आतापर्यंतच्या उत्तीर्ण सर्व बॅचेसचे १००% प्लेसमेंट

"अ" दर्जा प्राप्त सौ.के.एस.के. (काकू) | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी मान्यताप्राप्त अन्नतंत्रज्ञान आणि कृषि महाविद्यालय महसोबा फाटा, नगर रोड, बीड - ४३१ १२२

कॉलेज ऑप्शन नंबर - बी. टेक. (फूड टेक.) - १६१७७ आणि बी.एस्सी (ऑनर्स) ॲग्री - ११२१३.

फॉर्म भरताना विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयाचा ऑप्शन एक नंबरला देणे

ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याचा अंतिम दि. १७ जुलै २०२५

प्रवेशासाठी संपर्क कार्यालय :- सागर हाईट्स, बस स्टँड समोर, बीड - ४३१ १२२

संपर्क क्र. :- ९४२००२५०५२ / ९७६३४३४५०४ / ९९७०८४२०१४ / ७५८८०८२०३४ / ९९४१००१२१२


# सगळीकडे मुसळधार, मराठवाड्यात कधी येणार पाऊस!

## महाराष्ट्रासह १६ राज्यांना हायअलर्ट; आयएमडीच्या नव्या इशाऱ्याने चिंता वाढली

**मुंबई । प्रतिनिधी**

**भारतीय हवामान विभागाकडून पुढील दोन ते तीन दिवस उत्तर – पश्चिम भारत आणि पुढचे चार ते पाच दिवस मध्य भारतामध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्रासह १६ राज्यांना हायअलर्ट देण्यात आला असला तरी मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यात अजूनही पाऊस नाही. त्यामुळे पावसाच्या प्रतिक्षेत असलेल्या मराठवाड्यातील जिल्ह्यात दमदार पाऊस कधी पडतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**



भारतीय हवामान विभागाकडून पुढील दोन ते तीन दिवस उत्तर पश्चिम भारत आणि पुढचे चार ते पाच दिवस मध्य भारतामध्ये अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार उत्तर–पश्चिम भारत आणि मध्य भारातामध्ये पुढील ४८ ते ७२ तास जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या सर्व पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडू अनेक

### पुढील ४८ तास धोक्याचे

भारतीय हवामान विभागानं दिलेल्या इशाऱ्यानुसार पुढील ४८ ते ७२ तासांमध्ये अनेक राज्यांमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. मध्य प्रदेश, जम्मू काश्मीर, हरियाणा आणि हिमाचल प्रदेश या राज्यांसाठी पावसाचा हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर दुसरीकडे महाराष्ट्रातही अनेक भागांमध्ये पावसाची शक्यता आहे.

राज्यांना हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे, नागरिकांना देखील सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार मध्य प्रदेश, हरियाणा, चंदीगढ, दिल्ली, हिमाचल प्रदेश, जम्मू, पंजाब आणि उत्तर पान २ वर

## थोडक्यात...

### बच्चू कडू यांच्या पायदळ यात्रेला सुरुवात

जळगाव–बच्चू कडू यांनी पायदळ यात्रेला सुरुवात केली असून त्यांनी आतापर्यंत ९५ किलोमीटरचा टप्पा पूर्ण आहे. शेतकऱ्यांच्या शेतात असणाऱ्या प्रशासनाच्या गाड्या बाहेर काढण्यावरून पोलीस आणि शेतकऱ्यांच्या मध्ये यावेळी वादावादीचा प्रकार देखील घडला आहे. आक्रमक शेतकरयांनी कोणत्याही परिस्थितीमध्ये शक्तिपीठ महामार्गासाठी मोजणी होऊ देणार नाही,अशी भूमिका शेतकरी व शेतकरी संघटनांकडून घेण्यात येत आहे,त्यामुळे मोजणी कशी करायची, असा प्रश्न प्रशासनासमोर निर्माण झाला आहे.

### संजय गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल

मुंबई–आमदार संजय गायकवाड यांच्यावर मरीन डाईव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गायकवाड यांनी आमदार निवास कँटीनमध्ये कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. त्यानंतर राज्यात याविषयी जोरदार चर्चा होऊन गायकवाड यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी होऊ लागली होती.

### मी कारवाईला घाबरत नाही– संजय गायकवाड

मुंबई–मी कारवाईला घाबरत नाही, मी कायदा हातात घेतला आहे, जे होईल त्याला मी सामोरं जाईन अशी प्रतिक्रिया शिंदे शिवसेनेचे आ. संजय गायकवाड यांनी दिली आहे.

### शिंदेंनी फडणवीसांची शाहांकडे तक्रार केली–राऊत

मुंबई–एकनाथ शिंदे हे काल दिल्लीवारीवर असताना त्यांनी देवेंद्र फडणवीस यांची तक्रार केल्याचा टोला खासदार संजय राऊत यांनी लगावला आहे. ते आमची अडचण करत आहेत, ते आम्हाला काम करू देत नाहीत असा ते म्हणाल्याचा चिमटा राऊतांनी काढला.

### पालिका निवडणुका ३ टप्प्यात?

मुंबई–राज्य निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. पालिका निवडणुका ३ टप्प्यात होण्याची शक्यता आहे. १ जुलै पर्यंतची मतदार यादी वापरावी असे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

### दूध भेसळीचा गोपीचंद पडळकरांचा आरोप

मुंबई–दूध भेसळ होत असल्याचा गोपीचंद पडळकरांचा आरोप असून दूध भेसळ होत असल्याने नागरीकांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पडळकर यांनी माध्यमांसमोर डेमो देत भेसळ थांबली पाहिजे, दुधाला भाव मिळाला पाहिजे असे वक्तव्य गोपीचंद पडळकर यांनी केले आहे.

### जायकवाडी धरण ७० टक्के भरले

संभाजीनगर : मराठवाड्यासाठी महत्त्वाचे असणारे जायकवाडी धरण तब्बल ७० टक्के भरले आहे. त्यामुळे पिण्याचा पाण्यासह सिंचनाचा प्रश्न मिटला आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यातच जायकवाडी ७० टक्के भरल्याने मराठवाड्यातील नागरिक सुखावले आहेत. नाशिकमधून गेल्या महिनाभरात सोडलेल्या पाण्यामुळे जायकवाडीच्या जलसाठ्यात झपाट्याने वाढ झाली आहे.

### चित्रपटाचे ऑनलाइन तिकीट महागणार?

मुंबई–चित्रपटांच्या ऑनलाइन बुकिंगसाठी प्रेक्षकांकडून सेवा कर किंवा सुविधा शुल्क आकारण्यास प्रतिबंध करणारे राज्य सरकारचे २०१३ व २०१४ मधील दोन निर्णय उच्च न्यायालयाने रद्द केले. त्यामुळे चित्रपटांचे ऑनलाइन तिकिट महागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# नरेंद्र मोदी सप्टेंबरमध्ये राजीनामा देतील

## मोहन भागवतांच्या वक्तव्याने संकेत; वयाचे ७५ वर्ष पुर्ण होताच निर्णय घेणार असल्याची चर्चा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**


**सरसंघचालक मोहन भागवत यांनी पंचाहत्तरीची शाल अंगावर पडली याचा अर्थ थांबायला हवे असे सांगत अप्रत्यक्षपणे पंतप्रधान नरेंद्र मोदींना सूचना केल्याचा दावा केला जात आहे. त्यातच आता शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी नरेंद्र मोदी सप्टेंबरमध्ये राजीनामा देतील असे भाकीत वर्तवले आहे. त्यामुळे राजकीय गोटात एकच खळबळ उडाली आहे.**

सरसंघचालक मोहन भागवत यांनी पंचाहत्तरीची शाल अंगावर



पडली याचा अर्थ थांबायला हवे असे

### मोहन भागवत काय म्हणाले?



७५ वर्षांची शाल ओढली जाते, तेव्हा त्याचा अर्थ तुमचे वय झाले आहे, आता बाजूला व्हा आणि आम्हाला करु द्या असे विधान मोरोपंत पिंगळे यांनी केल्याची आठवण सरसंघचालक मोहन भागवत यांनी सांगितली आहे. साप्ताहिक विवेक निर्मित आणि मंदार मोरोणे व प्रांजली काणे लिखित 'मोरोपंत पिंगळे द आर्किटेक्ट ऑफ हिंदू रिसर्जन्स' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते नागपुरात पार पडला. यावेळी ते बोलत होते.

सांगत अप्रत्यक्षपणे पंतप्रधान नरेंद्र मोदींना निवृत्तीचा सल्ला दिल्याचा दावा केला जात आहे. मोहन भागवत यांच्या विधानानंतर आता नरेंद्र मोदींच्या निवृत्तीची चर्चा रंगलेली असताना पान २ वर

# आता २ तासांच्या उपचारांसाठीही आरोग्य विमा

**मुंबई । प्रतिनिधी**

**गेल्या काही काही काळात वैद्यकीय शास्त्रात प्रगती झाल्याने अनेक शस्त्रक्रिया आणि उपचार खूप कमी वेळात पूर्ण होत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आता आरोग्य विम्याचे नियमही बदलले आहेत. आता दोन तासांच्या उपचारासाठी आरोग्य विम्याचा लाभ घेता येणार आहे.**

तुमच्यापैकी अनेक जणांनी आरोग्य विमा घेतलेला असेल. तुम्ही आजारी पडलात किंवा एखादी सर्जरी करायची असेल तर तुम्हाला आरोग्यविम्याचा फायदा होत असतो. गेल्या काही काही काळात वैद्यकीय शास्त्रात प्रगती झाल्याने अनेक शस्त्रक्रिया आणि उपचार खूप कमी पान २ वर

### आरोग्य विम्याच्या नियमात बदल

या कंपनीच्या आरोग्य विमा विभागाचे प्रमुख सिद्धार्थ सिंघल यांनी सांगितले की, आता विमा कंपन्यांनी कमी काळाच्या उपचारांनाही कव्हर देण्यास सुरुवात केली आहे. पूर्वी कमी काळ उपचार घेणाऱ्या रुग्णांना विमा मिळत नसे, मात्र आता अनेक बड्या कंपन्यांनी आपल्या नियमांमध्ये बदल केला आहे.

# पुरस्कार प्राप्त शिक्षकांची वेतनवाढ रखडली

## शिक्षण भागाकडूनच हेळसांड; शिक्षकांमध्ये संतापाची लाट




### जि. प. च्या स्वखर्चातून वेतन वाढ

२००० मध्ये पुरस्कार प्राप्त शिक्षकांना विशेष शिक्षकांना वेतन वाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर २००९ मध्ये न्यायालयाने त्यावर काही बंधने घातली मात्र त्यानंतर २०१८ मध्ये शासनाने अशा स्वरुपात दिल्या जाणाऱ्या वेतवाढ बंद केल्या मात्र त्यावर उपाय म्हणून जिल्हा परिषदेने स्वनिधीतून वेतन वाढीचा खर्च करण्यात यावा असे सुचवले. विशेष म्हणजे बीड जिल्हा परिषदेला स्वनिधी म्हणून दमडा सुध्दा नाही मग पुरस्कारप्राप्त शिक्षकांना वेतनवाढ मिळणार कशी? हा मोठा प्रश्न आहे.

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागांतर्गत प्रत्येक वर्षी शिक्षक दिनी ११ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जातो. यासोबतच जिल्ह्यातून एक विशेष शिक्षक निवडला जातो. अशा पुरस्कार प्राप्त शिक्षकाला वेतन वाढ दिली जाते, पान २ वर

# पीककर्जामुळे शेतकऱ्यांच्या खात्याला होल्ड न लावता मुदतवाढ द्या

## आ.संदीप क्षीरसागरांची प्रशासनाकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांनी पीककर्ज न भरल्याने आणि रिनिव्हल न केल्याने संबंधित बँकेकडून शेतकऱ्यांचे बचत खाते होल्ड केली जात आहेत. परंतु, सध्या शेतकऱ्यांची शेतीविषयक कामे सुरू आहेत आणि अनेक शेतकऱ्यांचे पाल्य विविध क्षेत्रात शिक्षण घेत आहेत.**



**अशाप्रकारे बचत खाते होल्ड केल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे बँक अकाउंट होल्ड न करता मुदतवाढ अथवा इतर काही पर्याय करण्यात यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाकडे केली आहे.**

बीड विधानसभा मतदारसंघ अनेक शेतकऱ्यांनी पीककर्ज न भरल्याने त्यांच्या बचत खात्यावर संबंधित बँकेकडून होल्ड लावला असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी केल्या होत्या. यावर आ.संदीप क्षीरसागर पान २ वर




**दैनिक राज्य लोकतंत्रच्या कार्यकारी संपादक पदी सुभाष चौरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शुक्रवारी त्यांनी पदभार स्वीकारला, यावेळी त्यांचा अशोक खाडे आणि अनिल जाधव यांनी सत्कार केला.**

# सोमवारी जेवनाचे वांदे होणार

## महाराष्ट्र बंद! सरकारच्या 'या' निर्णयाविरोधात मोठा एल्गार

**मुंबई । प्रतिनिधी**

**सोमवारी महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली आहे. यामुळे राज्याच्या महसुलावर मोठा परिणाम होणार आहे. या बंदमुळे सर्वसामान्य नागरीकांच्या जेवनाचे वांदे होणार आहेत.**

सरकारच्या कर धोरणांविरुद्ध इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनने १४ जुलै २०२५ बंद पुकारला आहे.

### संपूर्ण राज्यावर परिणाम होणार

१४ जुलै असणाऱ्या बंदचा परिणाम संपूर्ण राज्यावर होणार आहे. मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर या शहरांमध्ये बंदचा परिणाम जाणवणार आहे. सोमवारी सर्व परमिट रूम, बार आणि मद्यपान विक्री करणारे हॉटेल–रेस्टॉरंट बंद राहणार आहेत. हा बंद शांततेत असणार आहे, मात्र जर सरकारने दखल घेतली नाही तर आगामी काळात हिंसक आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

त्यामुळे सोमवारी राज्यातील सर्व परमिट रूम आणि बार पूर्णपणे बंद राहणार आहेत, यामुळे राज्याच्या पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ जुलै २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू:२२.५० क्विंटल | २,५२१ | २,६८४ | २,६३५ |
| ज्वारी/हायब्रिड :८७.०० क्विंटल | २,३५१ | २,६८१ | ३,२०१ |
| मका/लोकल: २.५०क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : २३.०० क्विंटल | ५,७०० | ६,४५१ | ६,१७२ |
| उडीद : १.५० क्विंटल | ४,४०० | ४,८०० | ४,६०० |
| बाजरी: ११.५० क्विंटल | २,६६७ | २,६६७ | २,६६७ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |

# राज्यात पशुपालन व्यवसायाला कृषी व्यवसायाचा दर्जा

## पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचे विधानसभेत निवेदन

**मुंबई । प्रतिनिधी**

**पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात पशुपालन व्यवसायास 'कृषी व्यवसायाचा' दर्जा देण्यात आला आहे. राज्यातील पशुपालन व्यवसायाला मोठा दिलासा देणारा हा निर्णय असून असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचे निवेदन पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज विधानसभेत केले.**

पशुसंवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले, पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी हा क्रांतीकारी निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे ७६.४१ लक्ष पशुपालक कुटुंबांना होईल. या निर्णयामुळे पशुजन्य उत्पादनातून सुमारे ७७०० कोटी रुपये इतकी वाढ अभिप्रेत आहे. मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले, या निर्णयानुसार राज्यातील वीज दर आकारणी, कृषी इतर या वर्गवारीनुसार न करता कृषि वर्गवारीप्रमाणे करण्यात येणार आहे. ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्याकरिता कृषि व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते त्याच दराने कर आकारणी करण्यात येईल., पशुपालन व्यवसायासाठी





आवश्यक असणाऱ्या खेळत्या भागभांडवलासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जासाठी पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेच्या धर्तीवर व इतर प्रयोजनासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याज दरात ४ टक्के पर्यंत सवलत देण्यात येईल व त्यासाठी स्वयंस्पष्ट मार्गदर्शक तत्वे व कार्यपध्दती विहित करण्यात येईल आणि कृषी प्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यात येईल. पशुसंवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले राज्याच्या सकल उत्पन्नात कृषि क्षेत्राचा वाटा १२ टक्के आहे. कृषि क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के आहे. राज्यातील पशुजन्य उत्पन्नाचा विचार करता भारतीय आरोग्य परिषदेने दैनंदिन आहारात शिफारस केलेल्या प्रमाणाइतके अंडी व मांस उपलब्ध नाही. तसेच दुग्ध उत्पादनात पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# शालेय सुविधांमध्ये तडजोड नसावी !

एकीकडे महाराष्ट्रातील विविध राजकीय पक्ष काही अस्मितांचे विषय ऐरणीवर आणून आंदोलने करण्याची भूमिका स्वीकारत असताना दुसरीकडे सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या शिक्षण क्षेत्राच्या विषयाकडे लक्ष द्यायला मात्र कोणालाच फुरसत नाही, असे विदारक चित्र दुर्दैवाने समोर आले आहे. सध्या सुरू असलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना राज्यातील शालेय शिक्षणाबाबत जी स्थिती मांडली आहे ती पाहता कोणत्याच राजकीय पक्षाला या विषयावर आंदोलन करावे असे का वाटत नाही. शाळांचीच स्थिती अत्यंत वाईट आहे याकडे कोणाचेच लक्ष नाही. शालेय शिक्षणमंत्र्यांनी विधानसभेत दिलेल्या आकडेवारीप्रमाणे, राज्यात तब्बल ८ हजार १२३ गावांमध्ये शाळांची सुविधा उपलब्ध नाही. १६५० गावांमध्ये प्राथमिक शाळा आणि ६ हजार ५६३ गावांमध्ये उच्च प्राथमिक शाळा नसल्याचे समोर आले आहे.

एवढेच नाही तर ज्या शाळा सध्या महाराष्ट्रात अस्तित्वात आहेत त्यापैकी अनेक शाळांमध्ये वीज, पिण्याचे पाणी, मुले-मुलींसाठी स्वतंत्र शौचालय अशा मूलभूत सुविधाही उपलब्ध नसल्याचेही समोर आले आहे. राज्यातील ग्रामीण भागामध्ये ही गंभीर परिस्थिती आहे. एकीकडे महानगरे आणि मोठ्या शहरांमध्ये आंतरराष्ट्रीय शाळा आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे पेव फुटले असताना आणि या शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना दुसरीकडे सरकारी आर्थिक पाठबळावर चालवल्या जाणार्या ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पडायच्या मार्गावर आहेत. महानगरामध्ये असलेल्या मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय शाळा किंवा मोठ्या शिक्षण संस्थांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मुलांना प्रवेश घेणे हा स्टेटसचा विषय असल्यामुळे लाखो रुपये फी भरून पालक अशा शाळांमध्ये मुलांना प्रवेश घेतात. पण ग्रामीण भागातील मुलांना जी शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे ती दुर्दैवाने योग्य प्रमाणात उपलब्ध करून दिली जात नाही, हे एक वास्तवही समजून घेण्याची गरज आहे. तुमच्या नेत्यांची मुले कोणत्या माध्यमाच्या शाळेत शिकली किंवा शिकत आहेत या विषयावरून वाद निर्माण करण्यामध्ये तज्ज्ञ असलेले राजकीय नेते ग्रामीण भागातील शिक्षणाच्या विदारक परिस्थितीकडे सपशेल दुर्लक्ष करताना दिसत आहेत. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये हिंदी विरुद्ध मराठी किंवा इतर कोणत्याही कारणांनी महानगरांमध्ये राजकीय पक्ष आंदोलने करत आहेत किंवा मोर्चेही काढत आहेत. राज्यातील ग्रामीण भागातील शालेय शिक्षणाची परिस्थिती सुधारावी म्हणून कोणत्या राजकीय पक्षाने एखादी भूमिका घेऊन आंदोलनाची घोषणा केली आहे असे दिसून येत नाही. मोठी महानगरे, मोठी शहरे किंवा निमशहरी भागातही आता इंग्रजी माध्यमाच्या शाळा किंवा मोठमोठ्या शिक्षण संस्थांच्या मराठी माध्यमाच्या शाळाही पोहोचल्या असल्याने आसपासच्या ग्रामीण भागातील मुलांचे पालकही याच शाळांमध्ये आपल्या मुलांचे प्रवेश व्हावेत त्यासाठी आग्रही असतात. साहजिकच या मुलांच्या घराजवळ असलेल्या शाळांची परिस्थिती जास्तच बिकट होत आहे. ग्रामीण भागातील अनेक सरकारी शाळांची दुरवस्था कल्पना करण्यापलीकडे आहे. अनेक शाळांमध्ये मोडकळीस आलेले वर्ग आहेत, अनेक शाळांची छपरे गळत आहेत, पावसाळ्यात विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे.

एकीकडे 'डिजिटल इंडिया'च्या माध्यमातून शाळांमध्ये संगणक पोहोचवण्याचे धोरण राबवले जात असतानाच हे संगणक चालवण्यासाठी मात्र वीज उपलब्ध नाही. विद्यार्थ्यांनी शाळेत यावे म्हणून जी 'शालेय पोषण आहार' योजना सुरू केली आहे तीसुद्धा अनेक शाळांमध्ये अशीच डगमगत सुरू आहे. साक्षरतेचा विचार करता देशातील प्रमुख राज्यांमध्ये महाराष्ट्राचा वरचा क्रमांक आहे. पण त्याच वेळी प्राथमिक आणि माध्यमिक शालेय शिक्षणाची ही दुरवस्थाही लक्षात घ्यावी लागणार आहे. महानगरी आणि शहरी क्षेत्रातील भव्य इमारतींमध्ये उभारलेल्या चकचकीत शाळा म्हणजेच खरे शिक्षणक्षेत्र नाही हे समजून घेण्याची गरज आहे. विद्यार्थी ज्या शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत त्या शाळांची अवस्था चांगली व्हावी यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत. ग्रामीण भागातील शालेय शिक्षणासाठी आंदोलन करणे आधुनिक काळातील राजकीय पक्षांसाठी ग्लॅमरस विषय नसेल, म्हणूनही सर्वच राजकीय पक्षांनी या विषयाकडे दुर्लक्ष केले असेल. पण जेव्हा राज्याचे शालेय शिक्षणमंत्री विधानसभेमध्ये राज्यातील ग्रामीण भागातील शालेय शिक्षणाची विदारक स्थिती मांडतात तेव्हा सरकारला मात्र त्याची दखल घ्यावी लागणार आहे. विरोधी पक्ष किंवा इतर राजकीय पक्ष आंदोलन करतील किंवा नाही करतील, पण सरकारला मात्र आपली जबाबदारी टाळता येणार नाही.

# बीड जिल्हयातून बदलून गेलेल्या अधिकाऱ्यांचा ही येथील लोक जिव्हाळा ठेवतात-प्रा.ईश्वर मुंडे

## अधिवेशनादरम्यान नवल किशोर राम व प्रा.ईश्वर मुंडे यांची भेट

**मुंबई । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती व शेती अधारीत उत्पन्न कमी आसले तरी बीड जिल्ह्यातील लोक कष्टाळू,मेहनती तेवढेच प्रेमळ आहेत. बीड जिल्ह्यात अधिकारी म्हणून आलेल्या प्रमाणीक अधिकाऱ्यांना सहकार्य व प्रेम देऊन त्यांना डोक्यावर घेतात याची अनेक उदाहरणे घडलेले आहेत.**

या मध्ये महाराष्ट्र राज्याचे विद्यमान मुख्य सचिव राजेश कुमार,सेच्छा सेवानिवृत्त विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर तसेच नवल किशोर राम,आशोक धिवरे,अखिलेश कुमार या आय.ए.एस. व आय.पी.एस.अधिकाऱ्यांची नावे सर्व जिल्हावाशीयांच्या मनात व ओठांवर आहेत. सध्या महाराष्ट्र राज्याचे पावसाळी अधिवेशन विधान भवन मुंबई येथे चालू आहे.या अधिवेशनादरम्यान स्वेच्छा सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी व सध्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे नेते प्रा.ईश्वर मुंडे व पुणे महानगर पालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांची भेट झाली.उभयतांनी स्मीत हास्य,प्रेमाणे हस्तांदोलन केले.बीड जिल्ह्यातील विविध विषयांवर थोडक्यात चर्चा केली. बीड जिल्हयाचे तत्कालीन जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी बीड जिल्ह्यात नाविन्यपूर्ण काम केले होते.त्यांची बीड नंतर जिल्हाधिकारी संभाजीनगर,जिल्हाधिकारी पुणे,पंतप्रधान कार्यालय दिल्ली येथे बदली झाली.आता



ते पुणे महानगर पालिकेचे आयुक्त आहेत. प्रा.ईश्वर मुंडे व नवल किशोर राम यांची भेट म्हणजे अधिकारी बीड जिल्ह्यातून बदलून गेले तरी जिल्हयातील लोक आठवणी,प्रेम व जिव्हाळा कायम ठेवतात हेच सिध्द होते.

# डिजिटल मिडिया परिषदेचा सप्टेंबरमध्ये संभाजीनगरात राज्यव्यापी मेळावा

**मुंबई । प्रतिनिधी**

**डिजिटल मिडियात कार्यरत असलेल्या पत्रकारांचा पहिला राज्यव्यापी मेळावा १४ सप्टेंबर २०२५ रोजी संभाजीनगर येथे होत असल्याची माहिती मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर आणि डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी दिली..मेळाव्याचे उद्घाटन राज्यातील पत्रकारांचे नेते एस.एम.देशमुख यांच्या हस्ते होणार आहे.**

अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचा एक उपक्रम असलेल्या डिजिटल मिडिया परिषदेचा विस्तार राज्यभर झपाट्याने होत आहे.. राज्यातील ३० जिल्ह्यात डिजिटल मिडियाच्या शाखा सुरू झाल्या आहेत.. सर्वांना एका धाग्यात बांधण्यासाठी एक राज्यव्यापी मेळावा आयोजित करण्यात आला आहे.. या मेळाव्यात राज्य कार्यकारिणीची घोषणा होणार असून उत्कृष्ट युट्यूब चॅनल आणि पोर्टल चालविणारया दहा संपादकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. दोन सत्रात होणारया या मेळाव्यात व्यावसायिक पध्दतीने चॅनल कसे चालवावे, त्यातून महसूल कसा उभा



करावा, या संबंधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. मेळाव्याचे स्थळ आणि अन्य माहिती लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. राज्यातील युट्यूब, पोर्टलच्या संपादकांनी मेळाव्यास मोठ्या सख्येनं उपस्थित राहावे असे आवाहनही मिलिंद अष्टीवकर आणि अनिल वाघमारे यांनी केले आहे.

# शालार्थ आयडी आणि वैयक्तिक मान्यते शिवाय पगार नाही!

**बीड । प्रतिनिधी**

खाजगी शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे पगार काढण्यासाठी यापुढे त्यांचे शालार्थ आयडी आणि वैयक्तिक मान्यतेचे आदेश सोबत जोडावे लागणार आहेत. अन्यथा पगार बिल काढली जाणार नाहीत असे आदेश शालेय शिक्षण विभागाने काढले आहेत. त्यामुळे बोगस भरती झालेल्या शिक्षक आणि संस्थाचालक यांचे धाबे दनानले आहेत.

२०२२ ते २०२५ पर्यंत नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आयडी व मान्यतेचा आदेश: ज्या शिक्षक कर्मचाऱ्यांची नियुक्ती २०२२-२०२३, २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या वर्षात झाली आहे त्यांची शालार्थ आयडी मान्यता पत्र व शिक्षक मान्यतेच्या आदेश क्रमांक देण्याची मागणी लेखी पत्रातून वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालयाने केली आहे. त्यात आपल्या शाळेतील शिक्षक व शिक्षक कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक मानण्याचे आदेश द्यावेत, असेही नमूद केले आहे.२०२२ ते २०२५ या कालावधीत शिक्षक कर्मचाऱ्यांची नियुक्ती झाली आहे. त्यांच्या शिक्षण उपसंचालक नागपूर व अध्यक्ष विभागीय माध्यमिक, उच्च माध्यमिक विभागीय मंडळ, नागपूर यांचे शालार्थ आयडीचे पत्र द्यावे, हे पत्रात विशेषतः नमूद केले आहे.प्रपत्रात पदाच्या तपशील, रिक्त पदे, अतिरिक्त पदांची माहिती वेतन व भविष्य निर्वाह निधी कार्यालयात तत्काळ सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच मे २०२५ ची नियमित देयके स्वीकारली जाणार नाहीत, असे या लेखी पत्रात नमूद केले आहे.

# ५० हजार रुपयांचे काळविट प्राण्याचे दोन शिंगे केली जप्त

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड पोलिसांनी काळविट प्राण्याचे दोन शिगे एकुण किमती ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमालासह एका आरोपीला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर कार्यवाही .११ जुलै २०२५ रोजी करण्यात आलेली आहे.**

यावाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, अंबड पोलीस ठाण्याचे ठाणे प्रमुख पोलीस अधिकारी पोलीस निरीक्षक श्री संतोष घोडके यांना त्यांच्या गुप्तबातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एका संशईत इसमाच्या घरात काळविट प्राड्याचे शिग आहेत अशी खात्रीलायक माहिती मिळाल्यावरुन सदरची पंच व वन विभागाचे आर.एफ. ओ. श्री. दाँड, वनपाल बी. एम. पाटील, कपील शिंगणे, सुप्रिया फड वनरक्षक यांना देऊन दोन पंच व वन विभागचे वर नमुद अधिकारी कर्मचारी पो उप.नि. आर.ई काकड, पो.अं. राऊत, पो. अं. १६६० देशमाने




तसेच पोहेको १२७२ चव्हाण, मपोहेको/११७३ अलका केंद्रे, पो. अं २११ क्षिरसागर असे पो.स्टे. च्या शासकिय वाहनाने रवाना होऊन मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी इसम नसमे दादासाहेब रावसाहेब दिवटे रा. अंबड ता. अंबड जि.जालना पाचे अंबड मधील म्हाडा कॉलनीतील राहते घरी जाऊन त्यांच्या घराची परझडती पंचासमक्ष घेतली असता सदर इमसाच्या घरामध्ये काळविट प्राण्याचे दोन शिगे किमती ५०,०००/- रुपर्याचे मिळून आले. त्यानंतर मिळून आलेले दोन शिगएका कापडी पिशवीमध्ये टाकुन जप्त करण्यात आले आहे. सदर कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्री. अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधिक्षक नोषाणी, यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष घोडके, पी, उप.नि.आर.ई. काकड, पो अं. राऊत, पो में १६६० देशमाने तसेच पोहेको/ १२७२ चव्हाण, मपोहेको/११७३ अलका केंद्रे, पो. अं/२२१ क्षिरसागर तसेच वनविभागाचे आर.एफ.ओ. श्री. दॉड, वनपाल बी.एम. पाटील, कपील शिंगणे, सुप्रिया फड वनरक्षक आदीनी सदरील कारवाई संदर्भात मार्गदर्शन केले.

# चीनमधून बेदाण्यांच्या बेकायदा आयातीमुळे देशातील शेतकरी, राष्ट्रीय महसुलाचे नुकसान-उपमुख्यमंत्री पवार

**मुंबई । प्रतिनिधी**

**चीनमधून कर चुकवून निकृष्ट बेदाण्यांची मोठ्या प्रमाणावर आयात होत असून यामुळे द्राक्षउत्पादक शेतकऱ्यांचे आणि राष्ट्रीय महसुलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. चीनमधून होणारी बेदाण्यांची बेकायदा आयात तात्काळ थांबवावी. बेदाण्यांचे दर स्थिर ठेवून द्राक्षउत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात, अशी मागणी उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी पत्र लिहून केंद्र सरकारकडे केली आहे.**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यासंदर्भात केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याणमंत्री शिवराजसिंह चौहान तसेच केंद्रीय व्यापारमंत्री पियुष गोयल यांना पत्र लिहिले असून महाराष्ट्रातील आणि देशातील द्राक्षउत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले आहे. चीनमधून निकृष्ट दर्जाच्या बेदाण्यांची बेकायदा आयात वाढली आहे. आयात कर आणि शुल्क चुकवून बेदाणे मोठ्या प्रमाणावर भारतात आणले जात आहेत. या करचोरीमुळे शासनाचा महसूल बुडत असून देशाच्या महसुलाचे नुकसान होत आहे. ऐन हंगामात होत असलेल्या बेकायदा आयातीमुळे देशातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या बेदाण्यांचे दर प्रतिकिलो शंभर ते सव्वाशे रुपयाने घसरले आहेत. याचा फटका द्राक्षउत्पादक शेतकऱ्यांना बसला असून त्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. हे टाळण्यासाठी केंद्र सरकारने तात्काळ उपाययोजना करण्यात याव्यात. बेकायदा आयात व विक्री थांबवण्यासाठी कठोर कारवाई करावी. आयात होणाऱ्या बेदाण्यांचा दर्जा तपासण्यासाठी तसेच करवसुली योग्य, अचूक होण्यासाठी बंदरे, विमानतळ, बाजारपेठांच्या ठिकाणी तपास व करवसुली यंत्रणा कार्यक्षम करावी. ऐन हंगामात बाजारातील बेदाण्यांचे दर स्थिर राखून शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना तात्काळ कराव्यात, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याणमंत्री शिवराजसिंह चौहान तसेच केंद्रीय व्यापारमंत्री पियुष गोयल यांना लिहिलेल्या पत्रात केली आहे. महाराष्ट्र राज्य द्राक्ष उत्पादक संघ-पुणे यांनी यासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले होते तसेच हा प्रश्न सोडवण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्र सरकारला पत्र लिहिले आहे.

## पान १ वरून...

### सगळीकडे मुसळधार,

प्रदेशच्या काही भागांमध्ये अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. तर दुसरीकडे छत्तीसगढ, तटीय कर्नाटक, पूर्व उत्तर प्रदेश, झारखंड, महाराष्ट्र, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपूरा, ओडिशा राजस्थान, उत्तराखंड या राज्यांमध्ये देखील अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान देशातील बहुतांश राज्यात जोरदार पाऊस पडणार असल्याचे हवामान विभागाने सांगितले असले तरी मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यात अजूनही पाऊस नाही. कापूस या पिकासह सोयाबीन व इतर पिके सध्या संकटात सापडले असून देशात इतर भागात जरी मुळसधार पाऊस पडत असला तरी मराठवाड्यातील शेतकरी अजूनही पावसाच्या प्रतिक्षेत आहेत.

---------

### आता २ तासांच्या उपचारांसाठीही

वेळात पूर्ण होत असल्याचे समोर आले आहे. पूर्वी रुग्णांना काही दिवस रुग्णालयात रहावे लागत असे, मात्र आता लॅप्रोस्कोपी, लेसर शस्त्रक्रियेमुळे अवघ्या काही तासांत उपचार केले जातात.

प्रगत वैद्यकीय तंत्रज्ञानामुळे काही तासांत उपचार केले जातात. त्यामुळे आता आरोग्य विमा कंपन्यांनी आपले नियम बदलले आहेत. त्यामुळे आता तुम्ही कोणत्याही आजारावर केवळ दोन तास जरी उपचार घेतले असतील तरीही तुम्ही विम्याचा लाभ घेऊ शकता.

----------

### नरेंद्र मोदी सप्टेंबरमध्ये

शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी नरेंद्र मोदी सप्टेंबरमध्ये राजीनामा देतील असे भाकीत माध्यमांशी बोलताना वर्तवले आहे. मोहन भागवत यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना सांगितले आहे की, हीच तर समस्या आहे. बोलतातही आणि नंतर अंदाज लावण्यासाठी सोडून देतात. जर आहे तर स्पष्ट सांगितले पाहिजे. पुढे त्यांना सांगितले की, सरकारी कार्यालयांमध्ये निवृत्तीसाठी ६५ तर काही ठिकाणी ६० वयाची अट आहे. नरेंद्र मोदींनी सत्तेत आल्यानंतर राजकारणातून निवृत्त होण्यासाठी ७५ वय असावे अशी अटक स्वत: त्यांनी तयार केली. या नियमाचा प्रभाव अनेक ज्येष्ठ नेत्यांवर पडला आणि त्यांना निवृत्त केले गेले. त्यांना मार्गदर्शक मंडळात पाठवण्यात आले. नियम तयार करताना आपणही ७५ वर्षांचे होऊ याची कल्पना होती. तरीही त्यांनी तो नियम बनवला. अर्थात त्यांची ७५ वर्षं पूर्ण झाल्यानंतर ते आपला नियम तोडणार नाहीत. आम्हाला वाटते की, सप्टेंबरमध्ये किंवा एक दोन महिने पुढे मागे नियमाचा आदर करत राजीनामा देतील. नियमांचे पालन करुन त्यांनी आदर्श पाळला पाहिजे असा सल्लाही त्यांनी दिला आहे.

--------------

### पीककर्जामुळे शेतकऱ्यांच्या खात्याला

यांनी, शेतकऱ्यांना पीककर्ज भरण्याबाबत बचत खाते होल्ड न करता इतर नियमोचित व्यवस्था अथवा मुदतवाढ प्रणालीचा वापर, करून तगादा न लावता, कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये याची काळजी घेत मार्ग काढण्याची मागणी केली आहे. याबाबतीत जिल्हा अग्रणी बँक प्रशासन, विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी मागणी केली आहे.

---------

### पुरस्कार प्राप्त शिक्षकांची

प्रामुख्याने राज्य शासन न्यायालय आणि शिक्षण विभागातील दिरंगाई पाहता या आदर्श शिक्षकांची सेवानिवृत्तीनंतर मोठी खेळसांड सुरू असून त्यांची वेतनवाढ रखडली आहे. जिल्हा परिषदेमार्फत शिक्षण विभाग प्रत्येक वर्षी पाच सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील प्रत्येक तालुका निहाय एका शिक्षकाची आदर्श शिक्षक म्हणून तर जिल्ह्यातून एका शिक्षकाची विशेष शिक्षक म्हणून पुरस्कार देऊन गौरवले जाते. विशेषतः हा पुरस्कार मान आणि सन्मानाचा मानला जातो, त्यातच पुरस्कार प्राप्त शिक्षकांना वेतन वाढ मिळते. विशेष शिक्षकाला देखील वेतनवाढ दिली जाते मात्र बीड जिल्ह्यातील जवळपास ८३ सेवानिवृत्त असलेल्या आदर्श शिक्षकांना कोणतीही वेतनवाढ दिली गेली नाही. सण २००० मध्ये वेतनवाढ देण्याचा निर्णय झाला मात्र २००९ मध्ये शासनाने आदेश काढून वेतन वाढ देता येणार नाही असे सांगितले. प्रामुख्याने त्यानंतर न्यायालयाच्या निर्णयाने २०१८ मध्ये त्यांना देण्यात येणारी नाममात्र रक्कम देखील बंद झाली. प्रामुख्याने आज हे शिक्षक निवृत्त असले तरी ते शिक्षण विभागांमध्ये वेतन वाढीसाठी नियमित चकरा मारत आहेत. यातील अनेक वयोवृद्ध असल्याने त्या काळात त्यांना शिक्षण विभागातील कोणीही अधिकारी किंवा कर्मचारी चांगले मार्गदर्शन करत नसल्याने शासनाने आणि जिल्हा परिषदेने आदर्श आणि विशेष शिक्षक पुरस्कार देऊन सुध्दा सेवानिवृत्त आदर्श शिक्षकांचे हेळसांड मात्र सुरूच ठेवली आहे.

---------

### सोमवारी जेवनाचे

महसुलावर मोठा परिणाम होणार आहे. हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनने म्हटले आहे की, सरकारने काही दिवसांपूर्वी दारूवरील व्हॅट दुप्पट केला आहे. त्यामुळे ज्यामुळे हॉटेल आणि बार उद्योगावरील आर्थिक भार वाढला आहे. त्याचबरोबर परवाना शुल्कात १५ टक्के आणि उत्पादन शुल्कात ६० टक्के वाढ करण्यात आली असल्याने व्यापाऱ्यांना त्रासाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे बंदची घोषणा करण्यात आली आहे. इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन आणि इतर संघटनांनी राज्य सरकारच्या निर्णयाचा निषेध केला आहे. संघटनांचे म्हणणे आहे की, ही करवाढ व्यवसायासाठी हानिकारक आहे, त्याचबरोबर लहान आणि मध्यम दर्जाच्या हॉटेल्स आणि बार चालवणे कठीण बनले आहे. यामुळे हजारो लोकांच्या नोकऱ्यांवर आणि लाखो कुटुंबांच्या उपजीविकेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

---------------------

### राज्यात पशुपालन व्यवसायाला

राज्यातील पशुधनाची उत्पादन क्षमता इतर राज्यांच्या तुलनेत कमी आहे. याशिवाय निती आयोगाच्या सन २०२१ च्या अहवालामध्ये पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये नियोजनपूर्वक व शास्त्रीय पध्दतीचे व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत असून त्यावर उपाययोजना करुन शेतकरी / पशुपालकांच्या आर्थिक जोखिम कमी करण्याची शिफारस केली असल्याचेही पशुसंवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी निवेदनात सांगितले.

----------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. १२ जुलै २०२५
३

## पं.सुनील कुलकर्णी यांच्या शास्त्रीय गायनाने बीडकर मंत्रमुग्ध

बीड । प्रतिनिधी

पं. सुनील कुलकर्णी यांच्या विशुद्ध शास्त्रीय गायनाने दर्दी रसिक मंत्रमुग्ध झाले.निखळ हिंदुस्थानी संगीताची मैफिल बऱ्याच दिवसांनी बीडकरांना ऐकायला मिळाली.



स्व.गायनाचार्य गोविंदराव जळगांवकर, यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आणि गुरुपौर्णिमेनिमित्त स्व.पं. प्रभाकर कारेकर यांचे शिष्य पं. सुनील कुलकर्णी,(नवी दिल्ली) यांच्या अभिजात गायनाचे आयोजन येथील हॉटेल विघ्नहर्ता करण्यात आले होते.

पं. सुनील कुलकर्णी यांनी राग भूप, शहाणा कानडा, मेघ मल्हार,बसंत बहार हे राग आणि या रागांचे मिश्रण असणाऱ्या ग्वाल्हेर घराण्यातील वैविध्यपूर्ण रचना सादर करीत एक आगळी वेगळी मैफिल रंगवली.यात त्यांनी सादर केलेल्या तराण्यांनी श्रोत्यांना ठेका धरायला लावला. तुझी मूर्त सुंदर देवा सजवितो सुरात , मर्मबंधातली ठेव ही , श्रीरंगा कमला कांता हरी पदरा ते सोड रे, ही गाणी सादर करून राग भैरवीतील ठुमरी सादर करून आपल्या रंगलेल्या गायनाची सांगता केली.त्यांना तबल्यावर धनंजय जळगांवकर यांनी हार्मोनियमवर सुदर्शन धुतेकर तर टाळावर प्रशांत सुलाखे यांनी सुंदर साथ केली.या कार्यक्रमाचे आयोजन समर्थ सांस्कृतिक मंडळाच्या वतीने सौ.विनया - राजीव हासेगावकर,सौ.सुनंदा प्रवीण देशमुख,सौ.प्रतिभा महेश वाघमारे यांनी केले होते.यावेळी गुरुपौर्णिमेनिमित्त संगीत क्षेत्रात कार्यरत बीड शहरातील गायक,वादक,संगीत शिक्षक यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश तालखेडकर यांनी तर आभार प्रदर्शन सुनंदा देशमुख यांनी केले.कार्यक्रमास भरत अण्णा लोळगे,प्रमोद कुलकर्णी, प्रमोद वझे,चंद्रकांत सबनीस,विजय कोठोडे,लक्ष्मीकांत सौंदत्तिकर,लक्ष्मीकांत खडकीकर,संजय पत्की, सतीश सुलाखे, अमर डागा,नामदेव साळुंके ,सुरेश साळुंके,अनंत मुळे,संगीता कुलकर्णी यांच्यासह रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वाराती रुग्णालयातील सुविधांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही -उपमुख्यमंत्री अजित पवार

## विधानसभेत आ. नमिता मुंदडा यांच्या मागण्यांवर सरकारकडून ठोस आश्वासन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**राज्य शासनाच्या आगामी कर्करोग धोरणांतर्गत अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात कर्करोग विभाग प्राधान्याने सुरू करण्यात येईल, त्यासोबतच विविध आजारासंदर्भातील सुपरस्पेशालिटी विभाग सुरू करण्यात येतील अशी ग्वाही वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानसभेत दिली. केज मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या प्रश्नावर त्यांनी उत्तर दिले.**

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (स्वाराती) या ग्रामीण भागातील एकमेव सरकारी वैद्यकीय संस्था असून, येथे केवळ मराठवाडाच नव्हे तर विदर्भातीलही रुग्ण मोठ्या प्रमाणात उपचारासाठी येतात. सध्या मंजूर खाटांच्या तिप्पट रुग्णसंख्या, तसेच वाढलेली विद्यार्थी संख्या लक्षात घेता मनुष्यबळ, यंत्रसामुग्री, पायाभूत सुविधा यांची तातडीने पूर्तता गरजेची आहे. या पार्श्वभूमीवर आ. नमिता मुंदडा यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात स्वाराती रुग्णालयाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या. सध्या पदवीपूर्व अभ्यासक्रमासाठी १५० विद्यार्थी प्रवेश घेत असूनही फक्त ५० विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसारच मंजूर मनुष्यबळ कार्यरत आहे. त्यामुळे वर्ग १ ते ४ संवर्गातील अतिरिक्त पदे मंजूर करून त्यांची तत्काळ पदस्थापना करावी, अशी मागणी त्यांनी केली. त्याचप्रमाणे, वाढलेल्या रुग्णसंख्येनुसार खाटांची संख्या ९२० पर्यंत वाढवून त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ मंजूर करावे. पूर्वी कार्यरत असलेला कर्करोग विभाग काही कारणास्तव बंद करण्यात आला होता.



त्यामुळे गरीब रुग्णांना उपचारासाठी लांबवर जावे लागते. त्यामुळे कर्करोग तपासणी व उपचार युनिट पुन्हा सुरू करण्याची त्यांनी आग्रही मागणी केली. याशिवाय संस्थेमध्ये बीएस्सी नर्सिंग अभ्यासक्रम नव्याने सुरू करणे, जीएनएम विद्यार्थ्यांची संख्या २० वरून १०० करणे, तसेच नवीन विविध सुपरस्पेशालिटी युनिट्स सुरू करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. आ. नमिता मुंदडा यांच्या या ठोस मागण्यांवर उत्तर देताना वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी स्वाराती रुग्णालयात कर्करोग विभाग पुन्हा सुरू करण्यास प्राधान्य दिले जाईल, न्युरोलॉजी, कार्डिओलॉजी, न्युरोसर्जरी यासारखे सुपरस्पेशालिटी विभाग सुरू करण्यात येतील अशी ग्वाही दिली. तसेच वित्तमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी संस्थेला निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही व सर्व प्रलंबित कामे चालू वर्षाअखेरपर्यंत पूर्ण केली जातील, असे स्पष्ट केले.

## पान ६ वरून...

### जनतेचा आवाज बंद करणाऱ्या

१२०० हरकती? त्यातही आम्ही म्हणजे पत्रकारांनी पाठविलेल्या किमान ५०० हरकती.. १०-५ हजार हरकती पाठवू शकतील एवढीही ताकद राज्यात विरोधकांची उरली नाही? समितीत नाना पटोले, जितेंद्र आव्हाड होते.. त्यांनी तिथे काय दिवे लावले ?याचा खुलासा त्यांनी करायला हवा.. सभागृहात विरोधक गप्प का बसले? त्यांनी विधेयकास विरोध का केला नाही? पत्रकार संघटनांनी एकत्र येत मुंबईत आंदोलन केलं, यावेळेसही विरोधकांनी पत्रकारांना पाठिंबा देणारे साधे पत्रकही काढले नाही.. का? जनसुरक्षा कायद्याची चर्चा सुरू झाल्यापासून विरोधक अलिप्त का आहेत? संशय घेता येऊ शकेल असे प्रश्न अनेक आहेत. कोण करणार या साऱ्या शंकांचं निरसन? या कायद्यातले धोके विरोधकांना कळले नाहीत की, हा विषयच त्यांना फार महत्वाचा वाटला नाही..? की सारी मिलिभगत आहे? असेही प्रश्न विचारता येऊ शकतात.. जनसुरक्षा कायदा हा नक्षलवाद विरोधी आहे असं महाराष्ट्र सरकार सांगतंय, पण प्रश्न असा आहे की, ज्या पाच राज्यात १५-२० वर्षांपासून हा कायदा अस्तित्वात आहे तेथील नक्षलवाद संपला का? नाही संपला.. त्यामुळे या कायद्याचा उपयोग तिकडे सरकार विरोधी आवाज दडपून टाकण्यासाठीच झाला..महाराष्ट्रात तेच होणार आहे. या कायद्याचा धोका राजकीय पक्षांपेक्षा चळवळीतल्या कार्यकर्त्यांना, संविधान रक्षणासाठी लढणाऱ्यांना, चौथ्या स्तंभाचं स्वातंत्र्य अबाधित राहिलं पाहिजे यासाठी लढणाऱ्या पत्रकारांना अधिक आहे मग आपण का याला विरोध करायचा असा प्रश्न विरोधकांना पडला का ? नेमकं काय झालं.. कळत नाही.. देशातील विरोधकांचा अवसानघातकीपणा, जनहिताच्या प्रश्नापासून अलिप्त राहण्याची वृत्ती हेच भाजपचं बलस्थान आहे..विरोधक अडचणीत असतात तेव्हा त्यांना सामाजिक संघटना, पत्रकारांची मदत हवी असते, मात्र जेव्हा सामान्यांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न होतो तेव्हा विरोधक मूग गिळून गप्प असतात..का? हरकत नाही..तेही राजकारण करतात.. करू द्या.. पण ज्यांचा या कायद्याला विरोध आहे अशा समविचारी कार्यकर्त्यांनी एक तातडीची बैठक बोलावून त्यावर मंथन केले पाहिजे.. कायद्याच्या विरोधातली ही लढाई रस्त्यावर उतरून करायची की न्यायालयात? यावर चर्चा होऊन निर्णय झाला पाहिजे..कायद्यातील तरतुदींचं गांभीर्य सर्वांनी लक्षात घेतलं पाहिजे.. विरोधकांकडून आता फार अपेक्षा कोणी करू नये असेही एस.एम.देशमुख यांनी म्हटले आहे.

### सर्पमित्र सोन्या पाटिल

भक्षाच्या शोधात सध्या सर्प, अजगर आता मोकळे फिरताना दिसत आहेत, असाच प्रकार काल गुरुवारी मध्यरात्री ११:३० वाजता गेवराई तालुक्यातील टकलेवाडी शिवारातील लोक वस्तीवर मोठा अजगर दिसल्याने भिंतीचे वातावरण तयार झाले, लगेच सर्पमित्र सोन्या पाटिल यांनी फोन करुन या भल्या मोठा अजगर ला रेस्क्यू करण्यात आले, यावेळी, संरपंच नवनाथ गवते, तेजस साबळे, अजय मोटे,हार्षद धस, अकाश खेडकर, भिमा मोटे, व टकलेवाडी येथिल नागरीक मोठा संख्येने उपस्थित होते.

### बीडमध्ये मुंडे समर्थक

कारणास्तव राजकीय अज्ञातवासात असलेले धनंजय मुंडे सध्या पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने पुन्हा सक्रिय झाले आहेत. मागील वर्षभरात मस्साजोग प्रकरणानंतर मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागल्याने त्यांना मोठा राजकीय 'संघर्ष' करावा लागला होता. आता येत्या काही दिवसात होणाऱ्या त्यांच्या वाढदिवसानिमित्त पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी बॅनरबाजी करत त्यांना शुभेच्छा दिल्या असून 'संघर्षयोद्धा' या उल्लेखासह त्यांचे स्वागत केले आहे. त्यामुळे शहरात या बॅनरची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. तसेच, जिल्हाभरात मुंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या पदाधिकारी, समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या

जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनी बोलताना पक्षचे सभासद वाढविण्यासाठी नोंदणी अधिक जोमाने करण्यावर भर दिला. बीड, गेवराई मतदारसंघातील शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हा प्रमुख फरजाना शेख, प्रतिभा गणोरकर, शिला शिरसाट, शकुंतला गुंगाशे, सुरेखा राठोड, सविता राठोड, नुज्जत काजी, छाया राऊत, गंगाबाई खवणे, अर्चनाताई, दिलशान पिंजेरी, सविता ताई, आम्रपाली साबळे, नमिता माने, सुवर्णा मस्के, मनीषा शरणांगत, जयश्री जावळे, इंदुबाई जोगदंड आणि बीड आणि गेवराई मतदारसंघातील महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

### साईनाथ मतिमंद विद्यालयातील

समाजाच्या प्रमुख प्रवाहात आणण्याचे शिक्षण हे महत्वाचे माध्यम मानले जाते. असे मत मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.

यावेळी आयोजक सौ.सीमा मनोज ओस्तवाल (अध्यक्ष गुरू आनंद महिला प्रतिष्ठान बीड) विशेष अतिथी म्हणून गटशिक्षण अधिकारी मा. श्री. समंदर खान साहेब तसेच मा. श्री. शुभम धुत साहेब ( नगर सेवक बीड),मा. श्री निलेश उपाध्याय ( संपादक दै. पोलखोल) मा. श्री.दिलीप काळकुटे ( कार्यकारी संपादक दै. सूर्योदय ) मा.श्री. रमेश घोलप साहेब यांची उपस्थिती लाभली.तसेच मा.श्री. गोविंद सारडा सर .केंद्रप्रमुख नाथापुर आणि मा. श्री. सुनील येडे सर केंद्रीय मुख्याध्यापक नाथापुर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात गुरु पौर्णिमेचा कार्यक्रम संपन्न





बीड । प्रतिनिधी

**राजस्थानी सेवा समाज संचलित मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात गुरुपौर्णिमे निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन या वेळी शाळेच्या वतीने करण्यात आले.**

या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री गिरीश सोहनी सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सौ.जाजू मॅडम व बियाळे मॅडम तसेच श्री.तंबरे सर , शिराळकर सर होते.प्रमुख वक्त्या म्हणून सौ.ढेपे मॅडम व सौ. लोणकर मॅडम तसेच श्री लड्डा सर व श्री.मुळे सर हे होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर सर्व शिक्षकांचे गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांकडून स्वागत करण्यात आले. जवळपास ५० विद्यार्थ्यांनी यावेळी भाषणे केली यानंतर प्रमुख वक्ते मुळे सरांनी सुंदर अशी गोष्ट विद्यार्थ्यांना यावेळी सांगितली. तर सौ.ढेपे मॅडम यांनी सुंदर अशी कविता यावेळी सांगितली. श्री. लड्डा सर व सौ. लोणकर मॅडम यांनी गुरुपौर्णिमेचे महत्व सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सोहनी सर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना सांगितले की, गुरु म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे नेणारा दीपस्तंभ असतो. असे प्रतिपादन या वेळी त्यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन इयत्ता २ री ची विद्यार्थीनी कु.समीक्षा लाहोटी, सौ. जाधव मॅडम व सौ. गरुड मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ.चांडक मॅडम यांनी मानले. या कार्यक्रमाचे नियोजन बोरा सर व सुराणा मॅडम यांनी केले तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.यावेळी अनोख्या पद्धतीने विद्यार्थ्यांनी शाळेतील शिक्षकांचे पूजन केले.

## गुरुकृपा इन्स्टिट्यूट येथे फार्मसी प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्र

माजलगाव । प्रतिनिधी

नुकतीच शैक्षणिक वर्ष २०२५- २६ साठी राज्य सामायिक प्रवेश कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुबई यांच्याकडून बी. फार्मसी अभ्यासक्रमासाठी प्रथम व थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रिया वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनाही प्रवेश प्रक्रिया कळावी व त्यांना डी फार्मसी, बी.फार्मसी, एम फार्मसी अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, माजलगाव येथे प्रवेश प्रक्रिया सुविधा केंद्र (एफ सी २५७५) म्हणून मान्यता देण्यात आली आहे.



गुरुकृपा इन्स्टिट्युट येथील सुविधा केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश अर्ज संदर्भात मार्गदर्शन, वेळापत्रक, कागदपत्रे तपासणी व पडताळणी तसेच विद्यार्थी व पालक यांना समुपदेशन इत्यादी माहिती निःशुल्क करून देण्यात येणार आहे. महाविद्यात सुविधा केंद्र सर्व दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५ दरम्यान सुरू राहणार आहे, तरी पदवी, पदविका व पदवूत्तर पदवी औषध निर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी इच्छुक व पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधून सदरील सुविधा केंद्राचा लाभ घ्यावा असे आव्हान प्राचार्य अमित बिंदू यांनी केले आहे.

## आखिल भारतीय विद्यार्थी परिषद बीड शाखेकडून राष्ट्रीय विद्यार्थी दिन व गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, बीड शाखेच्या वतीने ९ जुलै राष्ट्रीय विद्यार्थी दिन आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदे चा ७७ वा. स्थापना दिन मोठ्या बीड जिल्हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शहरातील विविध महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना शुभेच्छा कार्ड देऊन राष्ट्रीय विद्यार्थी दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच शासकीय महाविद्यालयात ''कौशल्य विकासातील संधी व उद्योजकता विकास'' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. रमेश खंडागळे होते.यांनी सांगितले की आज चा विद्यार्थी हा कौशल्य पूर्ण असावा व तो नोकरी च्या मागे न पळता उद्योजक बनण्याच्या पर्यंत करणारा असावा. असे सांगत उद्योजकता विषयाचे महत्व व येणाऱ्या संधी सांगितल्या.

अभाविप स्थापना दिन आणि राष्ट्रीय विद्यार्थी दिनानिमित्त बंकट स्वामी महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमात प्राचार्य शंकर धांडे व अभाविप स्थायी कार्यकर्ते चंद्रकांत फड यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. या वेळीय अभाविप प्रांत प्रमुख प्रा. डॉ. अरुण पाटील, शहराध्यक्ष प्रा. डॉ. जगन्नाथ चव्हाण, शहर सहमंत्री आशिष वारे, राघवेंद्र कुलकर्णी, प्रद्युमन परजणे आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

तसेच बीड शहरातील विविध महाविद्यालयात जाऊन प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकवृंदांना भेटून गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा देण्यात आल्या. शहर सहमंत्री आशिष वारे, राघवेंद्र कुलकर्णी, प्रद्युमन परजणे, आशुतोष रणखांबे, ऋषिकेश लाखे, सार्थक कडु व इतर कार्यकर्ते सहभागी झाले होते.अभाविप बीड शाखेकडून घेतलेल्या या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थी आणि शिक्षकवर्गात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून भविष्यात असे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील असे शहर सहमंत्री आशिष वारे यांनी सांगितले.

## कुसळंब येथील श्री साईनाथ मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथील श्री साईनाथ मंदिर येथे प्रतिवर्षाप्रमाणे दोन दिवसीय गुरुपौर्णिमा उत्सव दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोठ्या भक्ती-भावाने आणि भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.दि.१०/०७/२०२५ गुरुपौर्णिमा गुरुवार रोजी पुजारी हनुमंत धनवटे,ह.भ.प.इंद्रराज गायकवाड महाराज, ह.भ.प.गहिनीनाथ महाराज मिसाळ यांच्या नियोजनात श्री साईबाबांची पालखी येथील खंडेश्वर मंदिरात नेण्यात येऊन खंडेश्वराचे व साईबाबाच्या पादुकांचे पूजन करण्यात आले.तसेच धर्मभूषण युवा किर्तनकार ह.भ.प.सुनील महाराज केकान यांच्या प्रवचनानंतर आरती व भाविक -भक्तांसाठी महाप्रसादाच्या पंक्ती पार पडल्या.या निमित्त या ठिकाणी दोन दिवस



भजन,किर्तन,प्रवचन असे धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले.गुरुपौर्णिमा उत्सव प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य अश्विनीताई जरांगे,भाजपा जेष्ठ नेते भाऊसाहेब भवर,सौताडा येथील सरपंच महादेव घुले,युवा नेते अर्जुन आबा पवार,रासपाचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर,तालुकाध्यक्ष आसाराम महारनवर,साफनकर सर,वसंत काळे,पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार,चंद्रकांत पवार तसेच दिलीप मस्के,जाधव सर,रामचंद्र सुळे सर,धोत्रे सर,दत्ता शिंदे,राम कापसे,दत्तात्रय जरे,बाबुराव धारक,अण्णा विटकर,अशोक येवले महाराज आदीसह महिला-पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी केकान महाराज यांनी प्रवचनातून गुरु-शिष्याचे महात्म सांगून जीवनात प्रत्येकाने गुरु केला पाहिजे.गुरु शिवाय जिवन व्यर्थ आहे.गुरु कसा असावा हे पटून दिले.प्रत्येकाने गुरु,ग्रंथ,संत यांच्या सहवासात राहून गुरूंच्या विचारांचे समर्थन करून प्रत्येकांनी आपल्या मुलावर चांगले संस्कार रुजवावेत असा सल्ला दिला.भाऊसाहेब भवर म्हणाले की,आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून या देवस्थानच्या विकासासाठी जिल्हा परिषद सदस्य अश्विनी जरांगे व मी येथे सभामंडप बांधण्यासाठी दहा लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध राहूत असा शब्द दिला. यावेळी रासपचे मतकर यांनी मनोगत व्यक्त करून आमचा पक्ष सत्तेत आला तर या साई मंदिराच्या देवस्थानासाठी आमचेही योगदान राहील असे आश्वासन दिले.श्री साई मंदिर देवस्थानच्या विकास कार्यासाठी भाऊसाहेब भवर आण्णा व सरपंच घुले यांनी यावेळी प्रत्येकी अकरा-अकरा हजार रुपये देणगी दिली.तसेच पुढील वर्षी या कार्यक्रमात महाप्रसाद पंगत अर्जुन आबा पवार यांच्या वतीने देण्यात येईल.या कार्यक्रमाला आलेल्या प्रत्येक मान्यवर भक्तांचे पुजारी हनुमंत धनवटे यांनी स्वागत केले.

## भारतीय संस्कार व संस्कृतीचे जतन गुरूंच्या मार्गदर्शनातूनच होईल - डॉ. हेमंत वैद्य

माजलगाव । प्रतिनिधी

**आजच्या वेगवान तंत्रज्ञानाच्या युगात पुढच्या पिढीमध्ये राष्ट्रभावना जागृत ठेवायची असेल आणि भारतीय संस्कार व संस्कृतीचे जतन हे गुरूंच्या मार्गदर्शनातून होईल.असे प्रतिपादन भा.शि. प्र.संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांनी केले.ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.**

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय सदस्य तथा संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे, स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, स्थानिक कार्यवाह ॲड.विश्वास जोशी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड,अर्थ समितीचे अध्यक्ष एकनाथ जाधव, प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांची प्रमुख उपस्थिती हती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि महर्षी व्यास यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.वैयक्तिक पद्य कुणाल कुलकर्णी यांनी सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी करताना म्हटले की,भारतीय संस्कृती ही प्रवाही आहे.गुरुपूजन उत्सवाचे निमित्त साधत विविध कार्यक्रम ठेवत त्यातून सर्वांना प्रेरणा मिळावी हा मुख्य उद्देश आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते इतिहास विभागाच्या राष्ट्रीय चर्चासत्र




माहिती पत्रकाचे व विज्ञान द्वितीय वर्षाच्या बदललेल्या अभ्यासक्रमावर आधारित कार्यशाळेचे पत्रकाचे विमोचन केले.अपरांत प्रकाशन पुणेच्या इतिहास विदुषी डॉ. कुमुद कानेटकर यांचेकडून चार हजार रु. च्या इतिहास विषयाच्या पुस्तकांची ग्रंथालयास भेट देण्यात आली.या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये यांना शैक्षणिक, सामाजिक, विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी करत असलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल श्री. सिद्धेश्वर महाविद्यालय प्रेरणा पुरस्कार सपत्नीक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी मानपत्राचे वाचन डॉ.कमलकिशोर लड्डा यांनी केले. यावेळी सत्कारमूर्ती डॉ.युवराज मुळये यांनी संस्थेचे व मान्यवरांचे ऋण व्यक्त केले.तसेच विद्यापीठ परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच नूतन महाविद्यालय विकास समिती सदस्याचे स्वागत करण्यात आले. यावेळी मंगलनाथ बँकेचे सी.ई.ओ. रवींद्र कानडे यांनी मनोगत व्यक्त करतांना संस्थेच्या प्रगतीसाठी अजून प्रयत्न केले जातील असे म्हटले.भा.शि. प्र.संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे यांनी प्रत्येकाला आयुष्यात गुरुची आवश्यकता आहे त्याशिवाय प्रगती अशक्य आहे असे म्हटले.विविध क्षेत्रातील व्यक्तीची महाविद्यालय समितीवर निवड केल्यामुळे संकुलाच्या कार्याला गती मिळणार आहे.याप्रसंगी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी गुरुपौर्णिमेच्या मंगल दिवशी आयोजित कार्यक्रमाची स्तुती केली.स्थानिक कार्यवाह ॲड. विश्वास जोशी यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमाचे कौतुक करतांना शिक्षकांची प्रशंसा केली.अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर म्हणाले की,अतिशय मंगलमय कार्यक्रम व उपक्रमांची रेलचेल तसेच उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये यांना प्राप्त प्रेरणा पुरस्कारासह सर्वांनी प्रेरणा घेत कार्यप्रवण व्हावे. बहुआयामी अशा कार्यक्रमातुन अधिक समाजाभिमुख होत गेले तरच राष्ट्र उभारणी होईल.या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन डॉ. रमेश गटकळ यांनी केले.तसेच ऋण निर्देश व कल्याण मंत्र डॉ.विनायक देशमुख यांनी सादर केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना, प्रा.अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री, कार्यालय अधीक्षक विजय कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दुरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६
E-Mail ID:-tahsildarambad@gmail.com
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-८० दिनांक-०३/०७/२०२५

जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती महादेव आसाराम राऊत रा.साष्टपिंपळगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. नाव | अर्जदाराशी नाते | जन्म / मृत्यू दिनांक |
| --- | --- | --- |
| प्रसाद आसाराम राऊत | मुलगा | १६/०६/२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०३/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरीत
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अंबड

# सौर ग्राम स्पर्धेत विजेत्या गावाला एक कोटींचे अनुदान

## राज्यातील ६ जिल्ह्यातील ६३ गावांची निवड,सहा महिने चालणार स्पर्धा

पुणे : प्रत्येक जिल्ह्यात एक मॉडेल सौर ग्राम निर्माण करण्यासाठी सुरू केलेल्या स्पर्धेसाठी राज्यातील ६ जिल्ह्यातील ६३ गावांची निवड करण्यात आली आहे. यशस्वी गावाला केंद्र सरकारकडून एक कोटी रुपयांचे अनुदान मिळणार आहे. ही स्पर्धा सहा महिने चालणार आहे.

राज्यातील शंभर गावांना सौर ऊर्जेचा वापर करून ऊर्जा स्वयंपूर्ण बनविण्यासाठीची सौर ग्राम योजना महावितरणने यापूर्वीच सुरू केली आहे.त्याअंतर्गत आतापर्यंत १४ गावे सौर ग्राम झाली आहेत. महावितरणच्या योजनेखेरीज आता केंद्र सरकारच्या मॉडेल सौर ग्राम योजनेमुळे गावांना ऊर्जा स्वयंपूर्ण बनविण्यास अधिक चालना मिळणार आहे. महावितरणला मॉडेल सौर ग्राम योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. किमान पाच हजार लोकसंख्या असलेल्या गावांना मॉडेल सौर ग्राम योजनेसाठीच्या स्पर्धेत भाग घेण्याची संधी आहे. विविध जिल्ह्यांमध्ये गावे निवडण्याची प्रक्रिया सुरू आहे. सध्या सहा जिल्ह्यातील काही गावांची योजनेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यांना घरोघरी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंतर्गत छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यास प्रोत्साहन देण्यात येईल. तसेच त्या गावातील पथदिवे सौर ऊर्जेवर चालविणे, गावाची पाणी पुरवठा योजना सौर ऊर्जेवर चालविणे अशी विविध कामे सरकारी योजनांच लाभ घेऊन करण्यात येतील. संबंधित ग्राम पंचायतींनी गावकऱ्यांना प्रधानमंत्री सूर्य घर योजनेचा लाभ घेण्यास प्रोत्साहन देणे तसेच सार्वजनिक योजनांसाठी सौर ऊर्जेचा वापर करणे अपेक्षित आहे.



### या गावांचा समावेश

मॉडेल सौर ग्राम योजनेसाठी महाराष्ट्र राज्यातील परभणी जिल्ह्यातील सहा, अकोला जिल्ह्यातील २६, भंडारा जिल्ह्यातील ६, बुलडाणा जिल्ह्यातील १५, वर्धा जिल्ह्यातील ९ आणि गोंदिया जिल्ह्यातील एका गावाची निवड करण्यात आली आहे. या गावांमध्ये स्पर्धेला सुरुवात झाली आहे. जिल्ह्यानुसार नोव्हेंबर किंवा डिसेंबर महिन्यापर्यंत मुदत आहे. योजनेसाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करून त्या समितीमार्फत जिल्ह्यामध्ये योजनेची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी देखरेख व समन्वय करण्यात येत आहे.

## शेतकऱ्यांनो, निम्याटोड घालवा अन् उत्पादन वाढवा

शेतकऱ्याचे जीवन म्हणजे रात्रंदिवस मातीशी नाते. बी पेरतो, खते घालतो, पाणी देतो, उन्हातान्हात राबतो पण कधी कधी असे होते की, एवढे सगळे केल्यावरही पीक वाढत नाही, पाने पिवळी पडतात, झाडे मरगळतात, उत्पादन घटते आणि आपल्याला वाटते, काहीतरी चुकलेय. पण ती चूक आपल्या डोळ्यांना दिसत नाही. कारण ती मातीखालची आहे झाडाच्या मुळांमध्ये आहे आणि त्यालाच म्हटले जाते निम्याटोड!

निम्याटोड म्हणजे काय? निम्याटोड हे डोळ्यांना न दिसणारे सूक्ष्म कृमी असतात. हे मातीमध्ये किंवा मुळांच्या पेशींमध्ये राहतात आणि तिथूनच झाडाचं अन्न शोषून घेतात. यामुळे झाडाला पोषणच मिळत नाही मग झाड पिवळं पडतं, वाढ खुंटते, आणि शेवटी पीक हातातून जाते

निम्याटोड ओळखण्याची लक्षणे : झाडं पाणी असूनही मरगळलेली दिसतात. पानं पिवळी पडतात. मुळ्यांवर गाठी तयार होतात. झाड वाढत नाही, फुलं येत नाहीत. उत्पादनात अचानक मोठी घट. जेव्हा खतं दिली, तरीही पीक उभं राहत नाही तेव्हा निम्याटोड असण्याची शक्यता नक्की समजा.

या पिकांमध्ये असतो जास्त धोक : निम्याटोड जवळपास सर्वच पिकांमध्ये आढळतो, पण काही पिकांमध्ये तो अधिक घातक ठरतो. टोमॅटो, वांगी, मिरची, हरभरा, तूर, सोयाबीन, डाळिंब, केळी, संत्रा, कांदा, लसूण, गहू, फुलशेती- गुलाब, गेंदा, शेवंती.नियंत्रणासाठी सेंद्रिय उपाय : निंबोळी पेंड- २०० ते ३०० किलो/एकर. ट्रायकोडर्मा, व्हर्टिसिलियम, पॅसिलोमायसिस- जैव नियंत्रणासाठी उपयोगी. गोमूत्र, जीवामृत, कंपोस्ट- मातीचे आरोग्य टिकवतात.

हे करा प्रभावी उपाय :पिकांची फेरपालट- सतत एकाच प्रकारचं पीक टाळा. सोलरायझेशन- उन्हाळ्यात प्लास्टिक टाकून माती तापव. सेंद्रिय खतांचा वापर वाढवा- मातीतील उपयुक्त सुक्ष्मजीव वाढता.



## धिंगरी अळिंबी : लागवड तंत्रज्ञान

अळिंबी म्हणजे ॲगरिकस प्रवर्गातील आहारात अन्न म्हणून उपयोगी विशिष्ट प्रकारच्या बुरशीचे फळ आहे. या बुरशीची पुर्ण वाढ झाल्यानंतर त्याला फळे येतात व त्या फळांस अळिंबी किंवा भुछत्र असे म्हणतात तसेच इंग्रजीत मशरुम या नावाने ओळखले जाते. निसर्गामध्ये अळिंबीचे विषारी व बिनविषारी तसेच विविध आकार व रंगानुसार असंख्य प्रकार आहेत. त्यामुळे त्याचा खाण्यासाठी वापर करण्यापुर्वी ह्या खाण्यास योग्य आहेत किंवा नाहीत याची खात्री करुनच खावेत. अख्या जगाचा विचार केला असता जगभरात अळिंबीचे २००० प्रकार असुन भारतात त्यापैकी २०० प्रकारांची नोंद केली आहे. वेगवेगळ्या देशात मिळून एकुण १०-१२ प्रकारांच्या अळिंबीची व्यावसायिक स्तरावर लागवड करण्यात येते. त्यापैकी भारतात बटण, धिंगरी, दुधी व भाताच्या पेढ्यांवरील अळिंबीची लागवड प्रचलित आहे. अनेक शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून कमी भांडवलात कमी खर्चात कमी वेळेत अशी आहारात उपयुक्त ठरणारी धिंगरी अळिंबी उत्पादन करतात. ज्याला शास्त्रीय भाषेत ऑयस्टर म्हणतात. हा प्रकार अळिंबीच्या प्लुरोटस कुळातील आहे. ज्याला शिंपला किंवा पावसाळी छत्री या नावानेही ओळखले जाते.

धिंगरी अळिंबीस आहारात वैशिष्ठपुर्ण स्थान आहे. ओल्या धिंगरी अळिंबी मध्ये २.७८% प्रथिने, ०.६५% स्निग्ध पदार्थ, ५.२% कर्बादके, ०.९७% खनिजे, १.०८% तंतुमय पदार्थ, ९०% पाणी तसेच खनिंजांपैकी पालाश, स्फुरद, कॅल्शियम, लोह, सोडीयम इत्यादी घटक आहेत. जीवनसत्वापैकी ब-१, ब-२, आणि क यांचे प्रमाणही बऱ्याच भाजीपाला पेक्षा जास्त आहे. अळिंबीतील प्रथिनांमद्ये शरीरवाढीसाठी आवश्यक सर्व अमिनो आम्लांचा समावेश असून ती इतर भाजीपाल्यातील प्रथिनांपेक्षा उच्चप्रतिची पचनास हलकी असतात. अळिंबीमधील जीवनसत्व ब-२ मुळे शर्करायुक्त पदार्थांचे पचन रक्तवाहिन्यांचे आकुंचन कमी होणे व लहान मुलांचा बेरीबेरी रोग नियंत्रणास मदत होते. क जीवनसत्वामुळे मुलांना स्कर्व्ही रोग, नायसिन व पेटॅथिनिक आम्लामुळे त्वचेचे रोग व हातपायांच्या तळव्यांची जळजळ कमी होण्यास मदत होते. अळिंबीमध्ये पिष्टमय पदार्थ व शर्करा अत्यल्प असल्याने रक्तदाब असणाऱ्यांना गुणकारी व आरोग्यवर्धक ठरते. यामधील विविध औषधी गुणधर्मामुळे प्रामुख्याने लठ्ठपणा, उच्चरक्तदाब, हृदयरोग, मधुमेह, कर्करोग, इन्फ्लुएझा, पोलिओ, एडस, दमा, फुफुसांचे रोग, वंधत्व विषाणूजन्य व जीवाणूजन्य रोग प्रतिबंधास विशेष उपयोग होतो.

धिंगरी अळिंबीच्या जाती व वैशिष्टे : धिंगरी अळिंबीच्या रंग, रुप, आकारमान व तापमानाची अनुकुलता यानुसार प्रयोगशाळेत व निवड चाचणीद्वारे विकसीत केलेल्या भारतात व विशेषतः महाराष्ट्रात प्रचलित असणाऱ्या विविध जाती खालील प्रमाणे आहेत. १) प्लुरोटस साजोर काजु : या जातीची फळे करड्या रंगाची असतात. ही जात म्हणजे तापमान व आर्द्रता फरकास प्रतिकारक्षम आहे. याला आवश्यक तापमान २०-३० से. व आर्द्रता ८०-९० से. लागते. या जातीची फळे शिंपल्याच्या आकाराची आकर्षक व चविष्ट असल्याने याला चांगली मागणी आहे. २) प्लुरोटस इओस : या जातीची फळे गुलाबी रंगाची असुन २०-२५ से. तापमान व ६५ ते ९० % आर्द्रता असलेल्या वातावरणात चांगली वाढू शकते. ही फळे फुलांच्या गुच्छाप्रमाणे दिसत असून शिजवल्यानंतर थोडी रबरासारखी चिवट लागतात. ३) प्लुरोटस प्लोरीडा : या जातीची फळे आकाराने मोठी असुन गुच्छ पद्धतीने उगवते. या अळिंबीचा रंग पांढराशुभ्र असुन फळे काढणीस उशीर झाला तर फळे मऊ होवून काळसर पडतात. ४) प्लुरोटस फ्लॅबीलॅटस: या जातीचा आकार पंख्यासारखा असुन सुरुवातीला फळांचा रंग गुलाबी व नंतर पांढरा होतो. फळांचे देठ आखुड असुन फळे मऊ असतात. ५) हिपसीझायगस अलमॅरीस सुरुवातीला ह्या जातीची फळे निळ्या रंगाची असतात व नंतर फिक्कट होत जातात. फळे गुच्छ पद्धतीने असुन फळांना चांगली चव असल्याने बाजारात चांगली मागणी आहे.



धिंगरी अळिंबीच्या लागवडीची सुधारीत पद्धत : १) लागवडीसाठी जागेची निवड: धिंगरी अळिंबीच्या लागवडीसाठी अन्न, वारा, पाऊस यापासुन संरक्षण होईल अशा निवाऱ्याची गरज असते. पक्के किंवा कच्चे बांधकाम असलेली खोली किंवा शेड, अच्छादित असलेली झोपडी, बांबुच्या तट्ट्यापासुन तयार केलेली झोपडी किंवा पोल्ट्रीचे शेड वापरता येते. निवडलेल्या जागेस प्रखर सुर्यप्रकाश नसुन हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. २) लागवडीसाठी माध्यम: या अळिंबीची लागवड कुठल्याही पिष्टमय पदार्थ अधिक असणाऱ्या घटकांवर म्हणजे शेतातील पिकांच्या मळणीनंतर निरुपयोगी अश्या वाळलेल्या काडावर किंवा पालापाचोळ्यावर करता येते. यासाठी मुखतः भात, सोयाबीन, गव्हाचे काड, ज्वारी, बाजरी, मका याची व पाने, कणसे, भुईमुगाच्या शेगांची टरफले इत्यादींचा वापर करावा. ३) लागवडीसाठी वातावरण: लागवडीसाठी नैसर्गिक तापमान २२ ते ३० से. व हवेतील आर्द्रता ८५ ते ९०% असणे आवश्यक असते. म्हणून लागवडीच्या ठिकाणाचे तापमान व आर्द्रता यांचे नियंत्रण ठेवणेसाठी जमिनीवर तसेच हवेत चोहोबाजूंनी गोणपटाचे आवरण लावून त्यावर स्प्रे पंपाने पाणी फवारण्याची व्यवस्था करावी. साधारणः २५ से. तापमानास अळिंबीची वाढ होते. ४) लागवडीची पद्धत : लागवडीस लागणारे काड किंवा पालापाचोळ्याचे २-३ से.मी. लांबीचे बारीक तुकडे पोत्यामध्ये भरुन ६ ते ८ तास थंड पाण्यात बुडवून भिजत ठेवावे काडाचे पोते थंड पाण्यातुन काढुन त्यातील जास्त पाण्याचा निचरा करण्यासाठी १-२ तास तिवईवर ठेवावे. ५) काड निर्जंतुकीकरण : काड निर्जंतुकीकरणासाठी दोन पद्धती वापरल्या जातात. पहिली म्हणजे थंड पाण्यात भिजवलेल्या काडाचे पोते ८० से. तापमानाच्या गरम पाण्यात १ तास बुडवावे व नंतर गरम पाण्यातुन काढुन त्यातील जास्त पाण्याचा निचरा होण्यासाठी तिवईवर ठेवावे. किंवा काडाचे पोते ८० से. तापमानाच्या वाफेवर १ तास ठेवून निर्जंतुकीकरण करावे. काड थंड करण्यासाठी पोत्यासह सावलीत ठेवावे. दुसरे म्हणजे काड निर्जंतुकीकरणासाठी ७.५ ग्रॅम बाविस्टीन (बुरशीनाशक) व १२५ मिली फॉर्मेलीन (जंतुनाशक) १०० लीटर पाण्यात मिसळून त्यामध्ये वाळलेले काड पोत्यात भरुन १६ ते १८ तास भिजत ठेवावे. द्रावणातील काड पोत्याबाहेर काढून जास्त पाण्याचा निचरा करण्यासाठी ४ ते ५ तास ठेवावे व त्यानंतर हे काड ३५५५ से.मी. आकाराच्या ५ % फॉर्मेलीनमध्ये निर्जंतुक केलेल्या प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये थर पद्धतीने भरावे. ५ % फॉर्मेलीनचे द्रावण फवारुन निर्जंतुक केलेल्या बंदीस्त जागेत हे काम करावे. काड भरताना प्रथम पिशवीच्या तळाला अळींबीचे थोडेसे बियाणे टाकावे. नंतर ८-१० से.मी. जाडीचा निर्जंतुक केलेल्या काडाचा थर द्यावा व त्यावर अळिंबीचे बियाणे (स्पॉन) पसरावे. बियाण्याचे प्रमाण ओल्या काडाच्या वजनाच्या २% असावे. काड व स्पॉन याचे ४ ते ५ थर भरावे. भरताना तळहाताने काड थोडेसे दाबावे. पिशवी भरल्यानंतर दोऱ्याने पिशवीचे तोंड घट्ट बांधावे, पिशवीच्या चहुबाजुने सुईने किंवा टाचणीने ४०-५० बारीक छिद्रे पाडावीत. या पिशव्या निवाऱ्याच्या जागेत ठेवल्यास पिशवीमध्ये पांढरट बुरशीची वाढ दिसुन आल्यावर या पिशव्या फाडुन टाकाव्यात. बुरशीची वाढ होण्यास १५ ते १८ दिवस लागतात. बुरशीमुळे काड एकमेकांना घट्ट चिकटवुन त्याला ठेपेचा आकार प्राप्त होतो. यालाच बेड असे म्हणतात.

६) पिकाची निगा : धिंगरीचे प्लॅस्टिक पिशवीतुन काढलेले बेड योग्य अंतराव रॅकमध्ये ठेवावे अथवा शिंके बांधुन टांगुन ठेवावे. बेडवर दिवसातुन २ ते ३ वेळा पाण्याची हलकी फवारणी करावी. खोलीमध्ये जमीनीवर भिंतीवर पाणी फवारुन तापमान २५० ते ३०० से व हवेतील आर्द्रता (६५ ते ७५ %) नियंत्रित करावी. ३ ते ४ दिवसात बेडच्या सभोवताली अंकुर (पीनहेड) दिसु लागतात पुढील ३ ते ४ दिवसात त्याची झपाट्याने वाढ होवून फळे काढणीस तयार होतात. ८ ते १० दिवसांनी दुसरे पीक मिळते व त्यानंतर ८-१० दिवसांनी तिसरे पीक मिळते. साधारणपणे १ किलो वाळवलेल्या काडाच्या एका बेडपासुन ८०० ग्रॅम ते १ किलो ताज्या अळिंबीचे उत्पादन मिळते.

किडीचा बंदोबस्त करण्यासाठी काढणीनंतर प्रत्येक वेळी मॅलेथिऑन किंवा नुवान ०.०२ % (१० ली. पाण्यात २ मिली) या प्रमाणात फवारणी करावी. बेडवर फळे असताना किटकनाशके फवारु नये. ७) पाणी व्यवस्थापन : प्लॅस्टीक पिशवीतुन बेड काढल्यानंतर धिंगरी आळिंबी वाढीच्या काळात बेडवर दिवसातुन दोन-तीन वेळा पाण्याची लहान नोझल असलेल्या स्प्रे पंपाने हलकी फवारणी करावी. अळिंबीच्या बुरशीच्या वाढीच्या काळात पाणी फवारण्याची गरज नसते. ८) पिक संरक्षण : अळिंबी हे अतिशय नाजुक नाशवंत व अल्पमुदतीचे पिक आहे. सदर पिकावर ग्रीन मोल्ड व काळ्या छत्र्या हे दोन रोग येत असून शिरीड व फोरीड माशी या दोन किडी येतात, रोगांच्या नियंत्रणासाठी रुम व काड व्यवस्थित निर्जंतुक करणे गरजेचे आहे. तसेच किडींच्या नियंत्रणासाठी रुमच्या खिडक्यांना मच्छर जाळी लावणे व रुममध्ये इतरत्र कुठनही माशी शिरणार नाही याची काळजी घ्यावी.




### महत्वाच्या घटना

१६७४ : शिवाजी महाराजांनी इंग्रजांशी मित्रत्त्वाचा तह केला.
१७९९ : रणजितसिंग यांनी लाहोर ताब्यात घेतले व ते पंजाबचे सम्राट झाले.
१९२० : पनामा कालव्याचे औपचारिक उद्घाटन झाले. पण याआधीच ६ वर्षे तो वाहतुकीस खुला झाला होता.
१९३५ : आषाढ शुद्ध एकादशी आषाढी एकादशी 'प्रभात'चा 'चन्द्रसेना' हा मराठी चित्रपट मुंबईच्या 'मिनर्व्हा' चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. अनेक ट्रिकसीन्स असलेला हा चित्रपट याच नावाच्या मूकपटावर बेतलेला होता.
१९६० : राज्यातील भागलपूर आणि रांची विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.
१९६१ : मुठा नदीच्या आंबी या उपनदीवरील पानशेत व खडकवासला ही धरणे फुटल्यामुळे पुण्यात आलेल्या पुरात सुमारे २,००० लोक मृत्यूमुखी पडले तर १,००,००० लोक विस्थापित झाले.
१९६२ : लंडनमधील मार्की क्लबमधे 'द रोलिंग स्टोन्स' चा पहिला कार्यक्रम झाला.
१९७९ : किरिबातीला (इंग्लंडपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८२ : राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेची स्थापना
१९८५ : पी. एन. भगवती यांनी भारताचे १७ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९५ : अभिनेते दिलीपकुमार यांना 'दादासाहेब फाळके पुरस्कार' जाहीर
१९९८ : १६ व्या विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेत यजमान फ्रान्सने गतविजेत्या ब्राझिलचा ३-० असा पराभव करुन विश्वकरंडक जिंकला.
१९९९ : 'महाराष्ट्र भूषण' हा राज्याचा सर्वोच्च पुरस्कार सुनील गावसकर यांना प्रदान करण्यात आला.
२००१ : कृषीशास्त्रज्ञ डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना 'टिळक पुरस्कार' जाहीर

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०० : १०० ई .पूर्व : रोमन सम्राट ज्यूलियस सीझर यांचा जन्म.
१८१७ : हेन्री थोरो अमेरिकन लेखक व विचारवंत (मृत्यू: ६ मे १८६२)
१८५२ : अर्जेन्टीनाचे राष्ट्राध्यक्ष हिपोलितो य्रिगोयेन यांचा जन्म.
१८५४ : जॉर्ज इस्टमन अमेरिकन संशोधक व इस्टमन कोडॅक कंपनीचे संस्थापक (मृत्यू: १४ मार्च १९३२)
१८६३ : वि. का. राजवाडे इतिहासाचार्य (मृत्यू: ३१ डिसेंबर १९२६)
१८६४ : जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर अमेरिकन वनस्पतीतज्ञ, शिक्षणतज्ञ, संशोधक आणि शास्त्रज्ञ (मृत्यू: ५ जानेवारी १९४३)
१९०९ : बिमल रॉय प्रथितयश दिग्दर्शक (मृत्यू: ८ जानेवारी १९६६)
१९१३ : इंग्रजी लेखक मनोहर माळगावकर यांचा जन्म. (मृत्यू: १४ जून २०१०)
१९२० : यशवंत विष्णू चंद्रचूड सर्वोच्च न्यायालयाचे १६ वे सरन्यायाधीश (मृत्यू: १४ जुलै २००८)
१९४७ : भारतीय क्रिकेट खेळाडू पूचिया कृष्णमूर्ती यांचा जन्म.
१९६१ : भारतीय अभिनेते, गायक आणि निर्माते शिव राजकुमार यांचा जन्म.
१९६५ : संजय मांजरेकर भारतीय क्रिकेट भाष्यकार आणि माजी यष्टिरक्षक क्रिकेटपटू
१९८२ : अर्जुन पुरस्कार विजेता महिला टेबल टेनिसपटू अचंत शरत कमल यांचा जन्मदिन.
१९९७ : युवा नोबल पारितोषिक विजेता पाकिस्तानी स्त्रीवादी शैक्षणिक कार्यकर्त्या महिला मलाला यूसुफजई यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४८९ : दिल्ली येथील लोदी वंशाचे संस्थापक व शासक बहलूल खान लोदी यांचे निधन.
१६६० : बाजी प्रभू देशपांडे (जन्म: ? ? १६१५)
१८९२ : अलेक्झांडर कार्टराईट बेसबॉलचे जनक (जन्म: १७ एप्रिल १८२०)
१९१० : रॉल्स-रॉयस लिमिटेड चे सहसंस्थापक चार्ल्स रोलस्? यांचे निधन. (जन्म: २७ ऑगस्ट १८७७)
१९४९ : आयर्लंड चे पहिले राष्ट्राध्यक्ष डग्लस हाइड यांचे निधन.
१९९४ : हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीचा चालताबोलता इतिहास मानले जाणारे पटकथाकार व 'बॉम्बे पब्लिसिटी सर्व्हिस'चे वसंत साठे (आवारा, श्री ४२०, मेरा नाम जोकर, डॉ. कोटणीसकी अमर कहानी, राम तेरी गंगा मैली) (जन्म:)
१९९९ : राजेंद्रकुमार हिन्दी चित्रपट अभिनेता (जन्म: २० जुलै १९२९)
२००० : मराठी कवयित्री इंदिरा संत यांचे निधन.
२००१ : देवांग मेहता तंत्रज्ञान अग्रणी (जन्म: १० ऑगस्ट १९६०)
२०१२ : दारा सिंग मुष्टीयोद्धा आणि अभिनेता (जन्म: १९ नोव्हेंबर १९२८)
२०१३ : प्राण कृष्ण सिकंद ऊर्फ 'प्राण' चित्रपट अभिनेता (जन्म: १२ फेब्रुवारी १९२०)
२०१३ : बोस कॉर्पोरेशन चे स्थापक अमर बोस यांचे निधन. (जन्म: २ नोव्हेंबर १९२९)

# जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांच्या मदतीचे नियोजनात अपयशी

## १८५ दिवसात तब्बल १३० शेतकरी आत्महत्या ; चौकशीसह मदतीलाही विलंब

बीड । प्रतिनिधी

पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांच्या बीड अवकाळी पाऊस ,नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकांचा कर्ज परतफेडीचा तगादा या प्रमुख कारणांमुळे मनोधैर्य खचलेल्या शेतकऱ्यांनी जिल्ह्यात गेल्या १ जानेवारी २०२५ ते १४ जुलै २०२५ या १८५ दिवसात तब्बल १३० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यापैकी ९३ प्रकरणे पात्र ठरली आहेत तर १९ प्रकरणे मदतीस अपात्र ठरविण्यात आली असुन १८ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. विशेष म्हणजे यात पात्र अपात्रतेचा घोळ सुरूच असुन फेब्रुवारी, मे,जुन या महिन्यांतील प्रकरणांचा चौकशी अहवाल अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना मदतीचे नियोजन जमेना असे म्हणण्याची वेळ आली आहे.आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना तातडीने शासकीय मदतीसाठी निधी उपलब्ध करून देऊन कुटुंबाची परवड थांबवावी अशी



मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

अवकाळी पाऊस,नापिकी, कर्जबाजारीपणा आणि बँकांचा कर्ज परतफेडीचा तगादा या प्रमुख कारणांमुळे मनोधैर्य खचलेला शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतो. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना १ लाख रुपयांची शासकीय मदत दिली जाते. बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असुन शासनामार्फत दिली जाणारी मदत वेळेवर मिळणे बंधनकारक असतानाही महिनोंमहिने शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जात नसल्याने कुटुंबाची परवड होत आहे.

### बीड जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांबाबत अहवाल

| महिना | एकुण प्रकरणे | पात्र | अपात्र | प्रलंबित |
|---|---|---|---|---|
| जानेवारी | २५ | १९ | १६ | ०३-०० |
| फेब्रुवारी | २५ | २० | ०४ | ०१-०० |
| मार्च | २५ | २७ | २३ | ०४-०० |
| एप्रिल | २५ | २१ | १५ | ०५-०१ |
| मे | २५ | १४ | ११ | ०१-०२ |
| जुन | २५ | २० | ०८ | ०२-१० |
| ४ जुलै | २५ | ०० | ०० | ०४ |

(छापलेल्या ओळी: महिना –एकुण प्रकरणे–पात्र–अपात्र–प्रलंबित; जानेवारी २५–१९– १६–०३–००; फेब्रुवारी २५–२०–०४–०१–००; मार्च २५–२७–२३–०४–००; एप्रिल २५–२१–१५–०५–०१; मे २५–१४–११–०१–०२; जुन २५–२०–०८–०२–१०; ४ जुलै २५–००–००–०४)

दि.२८ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः शेतकरी आत्महत्यांचे प्रकरण मार्गी लावण्यासाठी महिन्यातून २ बैठका घेणार असल्याचे तसेच तालुका स्तरावरून तहसीलदारांना आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांचे प्रस्ताव १५ दिवसात जिल्हा समितीकडे पाठवण्याचे याबरोबरच जिल्हास्तरीय समितीने पात्र केलेल्या कुटुंबियांना शासकीय मदत देण्याची प्रक्रिया पुढील १५ दिवसांत पूर्ण केली जाणार असुन महिनाभरात आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना आर्थिक मदत मिळणार असल्याची माहिती दिली होती.मात्र हे आश्वासन हवेतच विरल्याचे दिसुन येते. कारण आजही १८ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असुन जुलै महिना अर्धा होत असताना फेब्रुवारी आणि मार्च महिन्यातील प्रत्येकी १ तसेच मे महिन्यातील २ ,जुन महिन्यातील १० आणि जुलै महिन्यातील ४ प्रकरणांचे अहवाल प्रलंबित आहेत. मदतीसाठी सुद्धा अशीच दिरंगाई सुरू असुन मे महिन्यातील २,जुन महिन्यातील ७ आणि चालु महिन्यातील ४ प्रकरणे आजही मदतीसाठी प्रलंबित आहेत. सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा बळी ठरत असताना शासन आणि प्रशासन दोन्ही स्तरावरील अनास्थेमुळे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांचे हाल होत आहेत. त्यामुळे एकंदरीतच जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे महिन्यातुन २ वेळा बैठक आणि महिनाभरात आर्थिक मदत देण्याचे आश्वासन हवेतच विरल्याची प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

> एकुण १ जानेवारी २०२५ ते ४ जुलै २०२५ दरम्यान १८५ दिवसांत १३० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यापैकी ९३ प्रकरणे पात्र ठरली असुन १९ प्रकरणे अपात्र ठरविण्यात आली असुन विशेष म्हणजे आजही १८ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. या कालावधीत ८४ लाख रुपयांची मदत देण्यात आली असुन सन २०२५ मधील १८ शेतकरी आत्महत्या प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित असुन प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याची दक्षता घेण्यात येत असल्याचे तहसीलदार (महसूल-१) जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांनी विभागीय आयुक्तांना शेतकरी आत्महत्या बाबत अहवाल सादर केला आहे.

---

# वृक्ष लागवड पंधरवडा मोहिमेचा थाटात शुभारंभ

## २६ जुलैपर्यंत शहरात मोठ्या प्रमाणात होणार वृक्षारोपण

परळी । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपच्या वतीने आयोजित वृक्ष लागवड पंधरवडा मोहिमेचा आज थाटात शुभारंभ झाला. आजपासून येत्या २६ जुलैपर्यंत शहराच्या विविध भागात मोठया प्रमाणात वृक्षारोपण करण्यात येणार आहे. दरम्यान या अभिनव उपक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले आहे.

शहरातील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या प्रांगणात सकाळी वृक्षारोपण करून या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या आवाहनानुसार त्यांच्या २६ जूलै रोजी येत असलेल्या वाढदिवसाच्या अनुषंगाने भाजपतर्फे हा वृक्ष लागवड पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने विविध जातींच्या वृक्षांची रोपे यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. आजपासून ते थेट २६ जूलै पर्यंत शहरातील विविध ठिकाणी सरकारी व खासगी जागेवर या मोहिमेतंर्गत वृक्षारोपण करण्यात येणार आहे. आज झालेल्या या कार्यक्रमास भाजपच्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टे, लक्ष्मीबाई देशमुख शिक्षण प्रसारक



मंडळाचे अध्यक्ष संजय देशमुख,सचिव रवींद्र देशमुख, कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे, ग्रामीण मंडल अध्यक्ष राजेश गित्ते, दीनदयाळ बॅकेचे राजेश्वर देशमुख,राजेंद्र ओझा, महादेव इटके,सुचितााताई पोखरकर,ज्ञानोबा सुरवसे,अच्युत जोगदंड,अरुण पाठक,अश्विन मोगरकर,प्रशांत कराड,बंडू नाना कोरे,अनिश अग्रवाल,अनिश शेख श्रीपाद शिंदे,दिलीप नेहरकर, जितेंद्र मस्के,सुशील हरंगुळे, रवींद्र देशमुख,श्रीनिवास राऊत राजेंद्र लोढा,सुदर्शन वाडकर, प्रा पंढरीनाथ गुट्टे, प्रा शाम नेरकर, प्रा अशोक पवार, प्रा प्रविण नव्हाडे आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा प्रविण फुटके यांनी केले तर अश्विन मोगरकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# बीड तालुक्यातील सरपंच पदाची मंगळवारी आरक्षण सोडत

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील १७५ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांच्या आरक्षणाची सोडत मंगळवार, १५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, बीड येथील बैठक सभागृहात होणार आहे. तालुक्यातील सर्व नागरिकांनी सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले आहे.

महाराष्ट्र ग्राम पंचायत निवडणूक नियम, १९६४ च्या नियम ३ (अ) प्रमाणे तालुकानिहाय २०२५ ते २०३० या कालावधीत गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीकरीता आरक्षित करुन संख्या निश्चित करण्यात आली आहे. सरपंच पदाचे अनुसूचित जाती, जमाती, मागास व खुला प्रवर्ग या प्रवर्गातील महिला आरक्षणासह आरक्षण सोडतीकरीता नियंत्रक अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी कविता जाधव, संपर्क अधिकारी म्हणून बीड तालुक्यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बीड गट विकास अधिकारी यांच्याकडून ग्रामपंचायतीची यादी व सन २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जाती, जमातीच्या लोकसंख्येच्या आधारे माहिती मागविण्यात आली आहे. सर्व ग्राम महसूल अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त ग्राम पंचायतच्या नोटीस बोर्डवर, चावडीवर सरपंच पदाच्या आरक्षणाची अधिसूचना, परिशिष्ट प्रसिद्ध करावी, सोडतीचा दिनांक, वेळ प्रसिद्ध करून प्रसिद्धी पंचनामा मागविण्यात आला असल्याचेही बीड तहसील कार्यालयाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

# गुरूंच्या चरणी कृतज्ञतेची वंदना: माईलस्टोन स्कूलमध्ये गुरू पौर्णिमा उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

शहरातील छत्रपती कॉलनीतील माईलस्टोन प्री स्कूल व माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल, तळेगाव , बीड मध्ये गुरू पौर्णिमा सोहळा उत्साहात आणि भक्तिभावात पार पडला. या निमित्ताने शाळेतील चिमुकल्यांनी 'गुरूवंदना' आणि 'गुरूपूजन' करत आपल्या गुरूंबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमात ''माता हीच पहिली गुरू'' या विचाराला साजेशा पद्धतीने विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून गुरूंचा महिमा उलगडला. अनेक चिमुकल्यांनी प्रभावी भाषण सादर करून उपस्थितांची मने जिंकली. उत्तम भाषण करणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसाठी आकर्षक ग्रीटिंग कार्ड्स बनवून 'गुरू' या संकल्पनेला भावनिक स्पर्श दिला. शाळेचे संचालक ज्ञानेश्वर तांबे, नम्रता तांबे, प्रिन्सिपल सारिका जगताप, समन्वयक रोहिणी गीते यांच्या



मार्गदर्शनाखाली गुरू पौर्णिमा उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षिका स्नेहल जोशी, पल्लवी ढाकणे, प्रीती लामतुरे, आशा जाधव, सुमती कासलीवाल, गंगा शेनकुडे, दीक्षा वाघमारे, संघमित्रा गायसमुद्रे, दीपा आगलावे, स्वातीताई, अयोध्याताई यांनी परिश्रम घेतले. गुरू पौर्णिमेचा हा कार्यक्रम केवळ परंपरेची साक्षरता नव्हे, तर मुलांमध्ये संस्कारांचे बीज रोवणारा क्षण ठरला.

गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने शहरातील छत्रपती कॉलनीतील माईलस्टोन प्री स्कूल व माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल, तळेगाव , बीड च्या विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसाठी खास ग्रीटिंग कार्ड्स तयार केली. रंग-बिरंगी कागदांवर, फुलांच्या रचना, प्रेमळ संदेश आणि 'आई-वडील हेच माझे पहिले गुरू' असा भावनिक स्पर्श या कार्ड्समध्ये दिसून आला. या उपक्रमातून केवळ सृजनशीलतेला चालना मिळाली नाही, तर विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांप्रती कृतज्ञतेची आणि प्रेमाची अभिव्यक्तीही केली. ही ग्रीटिंग्स म्हणजे चिमुकल्यांची खर्या अर्थाने गुरूदक्षिणाच होती.

---

# राज्यांतर्गत पीक स्पर्धा २०२५-२६ : शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी संधी

बीड । प्रतिनिधी

राज्यात कृषी उत्पादन वाढवण्यासाठी शासन दरवर्षी पीक स्पर्धा योजना राबविते. सन २०२५-२६ साठीही अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य उत्पादनात प्रगती करणाऱ्या प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. तालुका, जिल्हा व राज्य स्तरांवर ही स्पर्धा होणार आहे. सहभाग घेणाऱ्या शेतकऱ्यांची निवड त्यांच्या उत्पादकतेवर आधारित असेल.

खरीप हंगामात भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग व सुर्यफुल या एकूण ११ पिकांसाठी स्पर्धा घेतली जाणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांकडे त्यांच्या नावे जमीन असणे व ती स्वतः कसणे आवश्यक आहे. एकाचवेळी एकापेक्षा अधिक पिकांसाठी स्पर्धेत भाग घेता येतो. मात्र, त्या प्रत्येक पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असावी. अर्जासाठी विहित नमुन्यातील अर्ज (प्रपत्र-अ), प्रवेश शुल्क भरल्याचे चलन, ७/१२ व ८-अ उतारा, जात प्रमाणपत्र (आदिवासी असल्यास), आणि पिकाखालील क्षेत्राचा चिन्हांकित नकाशा आवश्यक आहे. मूग व उडीदसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२५ असून, उर्वरित पिकांसाठी ती ३१ ऑगस्ट २०२५ आहे. सर्वसाधारण गटासाठी प्रवेश शुल्क रु ३००, तर आदिवासी गटासाठी रु १५० असेल. विजेत्या शेतकऱ्यांना तालुका पातळीवर प्रथम क्रमांक रु ५,०००, द्वितीय रु ३,००० व तृतीय रु २,०००; जिल्हा पातळीवर अनुक्रमे रु १०,०००, रु ७,००० व रु ५,०००; तर राज्य पातळीवर अनुक्रमे रु ५०,०००,रु ४०,००० व रु ३०,००० इतकी पारितोषिके दिली जाणार आहेत. स्पर्धेबाबत अधिक माहिती व मार्गदर्शक सूचना कृषी विभागाच्या संकेतस्थळावर आहेत. तसेच शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एस. एम. साळवे यांनी केले आहे.

# सरपंच पदांचे तालुकानिहाय आरक्षणाचे वाटप जाहीर

बीड । प्रतिनिधी

शासन राजपत्र १३ जून २०२५ नुसार जिल्ह्यातील तालुकानिहाय सरपंच पदांचे आरक्षणाचे वाटप करण्यात आले आहे. शिवाय संबधित तहसील, ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर अधिसूचना प्रसिद्ध करण्याच्या सूचना उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी दिल्या आहेत.

जिल्ह्यातील एक हजार ३५ ग्रामपंचायतींच्या आरक्षणाचे वाटप झाले आहे. त्यामध्ये अनुसूचित जातीसाठी १४० पैकी ७३, अनुसूचित जमातीसाठी १३ पैकी ८, मागास प्रवर्गासाठी २७९ पैकी १४२ , खुला प्रवर्गासाठी ६०३ पैकी ३०४ महिलांसाठी आरक्षणाचे वाटप करण्यात आलेले आहे, तर १५ एप्रिल २०२५ च्या शासन राजपत्रान्वये जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील तलवडा ग्रामपंचायतीचे विभाजन होऊन पोईतांडा ग्रामपंचायती निर्मिती नव्याने झाली आहे, असेही श्री. सूर्यवंशी यांनी कळवले आहे.

# केएसके कृषि महाविद्यालयास फूड टेक्नॉलॉजी आणि अॅग्रीकल्चर प्रवेशास मुलींचा प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

सौ.के.एस.के. (काकू) अन्नतंत्रज्ञान (बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी) आणि कृषि (बी.एस.सी. ऑनर्स. अॅग्री) महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड, येथे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये चुरस निर्माण झाली असून यामधे विद्यार्थीनी (मुलींचा) प्रचंड उत्साह असून उत्स्फूर्तपणे पालकांसह मुली या महाविद्यालयात माहिती घेवून प्रवेशासाठी येत आहेत.

१२वी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी अन्नतंत्र आणि कृषि शिक्षणाची प्रवेश प्रक्रिया दि.४ जुलै २०२५ पासून सुरू असून अंतिम दि. १७ जुलै २०२५ आहे. तरी सर्व बारावी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी अन्नतंत्र (बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी) आणि कृषि (बी.एस्सी. ऑनर्स. अॅग्री) पदवी शिक्षणासाठी प्रवेश घेण्यास विद्यार्थ्यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्न असलेल्या ''अ'' दर्जा प्राप्त सौ.के.एस. के. (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालय म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरुन प्रवेशासाठी त्वरित यावे. या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी प्रवेशासाठी ज्या विद्यार्थ्यांनी सीईटी परिक्षा तसेच अभ्यासक्रमाशी संबंधित राष्ट्रीय प्रवेश परिक्षा जे.ई.ई. आणि एन.ई.ई.टी. दिलेल्या आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयास त्वरित संपर्क करून आपला प्रवेश निश्चित करावा. या महाविद्यालयाचे प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थी व पालकांनी सागर हाईट्स, बस स्टॅन्ड समोर, बीड येथे यावे, या ठिकाणी ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याच्या सर्व सुविधा विनामुल्य (मोफत) उपलब्ध आहेत.या दोन्ही महाविद्यालयांना कृषि विद्यापीठाचा अ दर्जा असल्याने तसेच महाराष्ट्रासह भारतात आणि विदेशातही या गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या अ दर्जा प्राप्त महाविद्यालयांचा नावलौकिक झाला असून, पदवी प्राप्त सर्व विद्यार्थी महाविद्यालय स्थापनेपासून शंभर टक्के नोकरीस तसेच चांगल्या आस्थापनेमधे उद्योग व्यवसायामधे स्वयंपूर्ण असल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याने सर्व भागातील पालकांमधे या महाविद्यालया बद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली आहे. यामुळे अत्यंत प्रचंड अशा उपस्थितीत विद्यार्थी प्रवेशास येत आहेत.

# आत्मलिंग शेटे यांचा सत्कार



परळी । प्रतिनिधी

मराठवाडा साथी परिवाराच्या वतीने परळी समाचार चे संपादक आत्मलिंग शेटे यांची भारतीय लघु व माध्यम वृत्तपत्र संघाच्या मराठवाडा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल गुरुपौर्णिमेचे औचित्य साधुन त्यांचा सत्कार करण्यात आला.

गेली ३५ वर्षापासून ते परळी समाचार हे वृत्तपत्र नियमितपणे चालवत आहेत. त्यांच्या या योगदानाबद्दल साथी परिवाराने गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून शाल श्रीफळ व पुष्पहार घालून त्यांचा सत्कार केला. त्याप्रसंगी दैनिक मराठवाडा साथीचे अनिलजी गायकवाड, संतोष जुजगर, तसेच संघर्ष नेता चे संपादक मोहनराव वाव्हळे, पत्रकार जगदीश शिंदे, अक्षरधामचे संपादक बालाजी जगतकर, बालाजी ढगे, राजेश जगतकर रावसाहेब जगतकर इत्यादी सर्व पत्रकार उपस्थित होते.तसेच बालाजी जगतकर यांची असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मेडियम न्यूज पेपर ऑफ इंडिया या संघटनेच्या बीड जिल्हा सरचिटणीसपदी निवड झाल्याचे मराठवाडा अध्यक्ष आत्मलिंग शेटे यांनी जाहीर केले.

---

# प्रशासन महामार्गावरील किती जणांच्या मृत्युची वाट पाहणार आहे ?

## आ. विजयसिंह पंडित यांचा विधानसभेत संतप्त सवाल

मुंबई । प्रतिनिधी

महामार्गावरील अपघातात मृत्युंची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. गढी येथील प्राणांकित अपघातानंतर त्याच्या विश्लेषणात्मक अहवालात अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत, सर्वोच्च न्यायालयाने अपघाताची गंभीर दखल घेतली, त्यावरही केवळ समित्यावर समित्या स्थापन करण्याचे काम करून प्रशासन फक्त कागदी घोडे नाचवत आहे. प्रशासन महामार्गावरील किती जणांच्या मृत्युची वाट पाहणार आहे ? असा सवाल गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत उपस्थित केला. अपघातातील मृत्यु पावलेल्यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत करा, निश्चित केलेल्या ब्लॅकस्पॉट बाबत सत्वर कार्यवाही करा, उड्डाण पुलांची कामे सुरु न करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द कारवाई करा आणि पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्याची मागणी आ. पंडित यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सभागृहात केली. मंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांनी या बाबत सकारात्मक उत्तर देवून आ. विजयसिंह पंडित यांनी केलेल्या मागणीनुसार योग्य उपाय योजना करण्याचे आश्वास दिले.

दि. २६ मे रोजी गढी येथील उड्डाण पुलावर झालेल्या प्राणांकित अपघातात सहा जणांचा मृत्यु झाला, हा गंभीर विषय आ. विजयसिंह पंडित यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून विधानसभेत उपस्थित केला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, अपघातानंतर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे दिलेल्या विश्लेषणात्मक अहवालात अनेक गंभीर बाबी समोर आल्या असून जय भवानी सहकारी साखर कारखान्याच्या समोरील उड्डाण पुल तांत्रिकदृष्ट्या योग्य नसल्याचे या अहवालात नमुद करण्यात आले आहे. अहवाल आल्यानंतरही प्रशासनाने कार्यवाही केली नाही. जिल्हाधिकाऱ्यांकडे या गंभीर विषयी चर्चा करण्यासाठी बैठक घेण्याची विनंती केली होती, मात्र त्यांनी या बाबीकडे दुर्लक्ष केले. मात्र सर्वोच्च न्यायालयाने प्रकरणाची दखल घेतल्यानंतर गेंड्याची कातडी पांघरून बसलेल्या प्रशासनाला जाग आली. त्यांनी कागदी घोडे नाचवून समित्यावर समित्या गठीत करण्याचे काम केले. या महामार्गावर सतत अपघात होणारे ब्लॅकस्पॉट निश्चित झालेले असताना त्यात सुधारणा करण्याचे काम संबंधित विभाग का करत नाही ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

गेवराई विधानसभा मतदार संघातील जाणारे धुळे-सोलापूर आणि कल्याण-विशाखापट्टणम् ? या दोन्ही राष्ट्रीय महामार्गावर रस्ते अपघातात मृत्युमूखी पडणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. महामार्गावरील सिरसदेवी सारख्या मोठ्या गावाच्या ठिकाणी पावसाळ्यात अक्षरशः तलावाचे स्वरुप प्राप्त होते. याठिकाणी आजवर दहा ते अकरा जणांचा अपघात झाला आहे. सातत्याने पत्रव्यवहार करूनही केवळ काम मंजुर आहे, टेंडर होताच काम सुरु होईल अशा प्रकारची आश्वासने मिळतात मात्र प्रत्यक्षात काम होत नाही, ही वस्तुस्थिती असल्याचे आ. विजयसिंह पंडित यांनी सभागृहात सांगितले. गेवराई शहराच्या लगत दोन्ही बाजूच्या प्रवेशिकेवर उड्डाण पुलांची कामे मंजुर आहेत, अग्रवाल नावाच्या कंत्राटदाराला ही कामे मिळाली असून दि.३१ मार्च रोजी त्याची मुदत पूर्ण झाली आहे असे असतानाही त्यांनी कामे सुरु केली नाहीत, या कंत्राटदाराविरुध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ? असा प्रश्न आ. पंडित यांनी यावेळी उपस्थित केला. रस्ते अपघातात मृत्युमूखी पडलेल्या सहा जणांच्या वारसांना शासनाने आर्थिक मदत द्यावी अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. शासनाच्यावतीने सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी या लक्षवेधी सूचनेला उत्तर दिले. महामार्गावर २६ ठिकाणी ब्लॅकस्पॉट निश्चित केले असून त्याबाबत उपाययोजना करण्याचे काम विभागाच्यावतीने करण्यात येईल, दि.२६ मे रोजी झालेल्या अपघातातील मृत्युंच्या वारसांना शासनाकडून मदत देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल तसेच आ. विजयसिंह पंडित यांनी केलेल्या मागणीनुसार रस्ते सुरक्षा समितीचे सदस्य, महामार्ग विभागातील वरिष्ठ अधिकारी यांची बैठक उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत घेण्यात येईल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

# पाटोदा जिल्हा परिषद शाळेत 'लोकशाहीचा शिक्षण प्रयोग'

## ईव्हीएम मशीनद्वारे वर्ग मंत्रिमंडळ निवडणूक उत्साहात



मंठा । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाटोदा येथील इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्ग मंत्रिमंडळ निवडणूक ही एक आगळी वेगळी आणि प्रेरणादायी शैक्षणिक प्रक्रिया ठरली. विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने ७ ते १२ जुलै या कालावधीत ईव्हीएमद्वारे ही निवडणूक गोपनीय आणि लोकशाही मार्गाने राबविण्यात येत आहे.या निवडणुकीत मुख्यमंत्री, अर्थमंत्री, परिपाठ नियोजन मंत्री, शिक्षण मंत्री, क्रीडामंत्री, वर्गसजावट मंत्री, सांस्कृतिक कार्य मंत्री आणि पर्यावरण मंत्री अशी एकूण ८ पदांसाठी घेण्यात आली.

मतदार प्रक्रियेत ७ जुलैला फॉर्म भरणे, ८ जुलैला फॉर्म मागे घेणे, ९ जुलैला प्रचारास सुरुवात आणि १० जुलै रोजी आधार कार्ड या पुराव्यासह विद्यार्थ्यांचे मतदान घेण्यात आले.११ जुलै रोजी मतमोजणी झाली तर १२ जुलै रोजी शपथविधी समारंभ घेण्यात येणार आहे. उपक्रमशील शिक्षक गंगाधर वानोळे यांच्या संकल्पनेतून आणि मुख्याध्यापक संतोष तोटेवाड, सहशिक्षक देविदास मामीलवाड, अनुजा पाटील, गीता बरसाले यांच्या सहकार्याने निवडणूक प्रयोग यशस्वी ठरला.इयत्ता दुसरीचे वर्गशिक्षक गंगाधर वानोळे यांनी सांगितले की, ''विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारी, वक्तृत्वकला आणि लोकशाही प्रक्रियेची समज निर्माण व्हावी यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे.''

# माजी आमदाराचा जावई लाच घेताना पकडला आता ए.सी.बी. करणार मालमत्तेची चौकशी

माजलगाव । प्रतिनिधी

येथील नगर परिषदेचे मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांना छत्रपती संभाजीनगर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सहा लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ अटक केली.या मोठ्या कारवाईनंतर एसीबीने लाचखोर मुख्याधिकारी चव्हाण याच्या मालमत्तेची माहिती मागऊन घेतली आहे. अनेक ठिकाणी शासकीय कर्तव्यावर असताना त्यामधून जमवलेली मालमत्ता असू शकते अशा संशयावरून एसीबीने आता माहिती गोळा केली असून या कारवाईनंतर त्याचे निवासस्थान आणि इतर ठिकाणी देखील एसीबीने चौकशी आणि पाहणी केली.



नगर परिषदेत गुत्तेदाराच्या कामाशी संबंधित फाईल मंजूर करण्यासाठी चव्हाण यांनी १२ लाख रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीनंतर ६ लाख रुपये देण्याचे ठरले.या प्रकरणाची तक्रार छत्रपती संभाजीनगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली होती.छत्रपती संभाजी नगर च्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन तक्रारीची खातरजमा केल्यानंतर सापळा रचण्यात आला. यात चव्हाण हा जाळयात अडकला. कारवाईनंतर बीड एसीबीलाही माहिती देण्यात आली.त्यानंतर बीड एसीबीच्या दोन पथकांनी रात्री उशीरापर्यंत त्यांच्या घराची झडती घेतली.मात्र झडतीत नेमके काय मिळाले? हे समजू शकले नाही. चव्हाण हा भाजपच्या माजी आमदारांचा जावई आहे.त्यामुळेच तो बेधडकपणे टक्केवारीची मागणी करत असल्याचा आरोप गुत्तेदारांकडून होत आहे.त्यांच्या अटकेने माजलगावमध्ये खळबळ उडाली आहे.कारवाई नंतर अनेक गुत्तेदात त्याच्या घरी जमले होते.

**चव्हाणला न्यायालयीन कोठडी**

**गुत्तेदाराच्या २ कोटीच्या बीलातील कमिशन म्हणून सहा लाख रुपयांची लाच घेताना माजलगाव नगर परिषदेचे मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यास लाचलुचपत विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडल्यानंतर दि ११ जुलै शुक्रवार रोजी न्यायालयासमोर हजर केले असता त्यांस न्यायालयीन कोठडी सुनावन्यात आली.**

# जनतेचा आवाज बंद करणाऱ्या जनसुरक्षा विधेयकावर विरोधक गप्प का?

## मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांचा सवाल

मुंबई । प्रतिनिधी

सभागृहात बहुमताने जनसुरक्षा विधेयक मंजुर होत असतांना विरोधकांचे गप्प राहणे धोकादायक आणि चिंताजनक असून या कायद्याचा धोका राजकीय पक्षांपेक्षा चळवळीतील कार्यकर्त्यांना अधिक आहे. तसेच चौथ्या स्तंभाचे स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी जनतेचा आवाज बंद करणाऱ्या विधेयकाला विरोध करण्यासाठी समविचारी कार्यकर्त्यांची व पत्रकारांची तातडीची बैठक घेऊन विचारमंथन व्हावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केले आहे.



एस.एम. देशमुख यांनी पुढे म्हटले आहे की, प्रश्न सत्ताधाऱ्यांचा नाही.. जनतेचा आवाज बंद करण्यासाठी त्यांना जे शक्य आहे ते करीत राहणारच..ज्यांना आम्ही सपोर्ट करतो ते विरोधक काय करतात हा कळीचा मुद्दा आहे.. १२-१३ कोटींची लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रातून जनसुरक्षा विधेयकाला विरोध करणाऱ्या फक्त ◀◀ पान ३ वर

# सर्पमित्र सोन्या पाटिल यांनी धरला २० किलोचा अजगर

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील टकलेवाडी शिवारातील मोटे यांच्या शेतवस्तीवर गुरुवारी रात्री १२:४८ मिनिटाने सर्पमित्र सोन्या पाटिल यांनी भला मोठा अजगर पकडला, या परिसरात लोक वस्ती असल्याने वस्तीवरील लोकांनी सर्पमित्र सोन्या पाटिल यांना दुरध्वनी वर फोन करुन बोलवले, हे सर्व जण अजगारला पाहुण भयभीत झाले होते, अंदाजे २० किलो वजनाचा अजगर असल्याची माहीत सर्पमित्र सोन्या पाटिल यांनी दिली, पावसाचे दिवस सुरु झाल्याने ◀◀ पान ३ वर

**सर्पमित्र सोन्या पाटिल आज पर्यंत पकडले तीन हाजार सर्प**

सर्पमित्र सोन्या पाटिल यांनी आज पर्यंत तीन हाजार साप व विहीर पडलेला अनेक प्राणीला रेस्क्यू करुन जंगलात सोडुन दिले आहे, त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे, त्यांना कॉल करताच विना विलंब ते ही सेवा करत असल्याने परिसरातील गांवात दिलास मिळत आहे.



# ग्रामपंचायत निवडणूक सरपंचपदाची १५ जुलै रोजी होणार आरक्षण सोडत

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टी तालुक्यातील एकूण १२५ ग्रामपंचायतींचे सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी होणाऱ्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी सरपंच पदाचे आरक्षणसोडतीचे आयोजन दि.१५ जुलै रोजी अकरा वाजता तहसील कार्यालय आष्टी येथे करण्यात आले आहे अशी माहिती तहसीलदार वैशाली पाटील दिली आहे.**

तहसील कार्यालय निवडणूक विभाग यांनी दि.९जुलै रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रकामध्ये पुढे म्हटले आहे की, मुंबई ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच अधिनियम १९६४ मधील नियम ३ प्रमाणे तालुक्यातील सरपंच पदाचे वेगवेगळ्या प्रवर्गासाठी तसेच समांतर आरक्षणासाठी आगामी कालावधी सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी गठित होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत तहसील कार्यालय येथे दि.१५ जुलै रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे आष्टी यावेळी नागरिकांनी तहसील कार्यालय येथे उपस्थित रहावे असे आवाहन त्यांनी केले आहे.

# बीडमध्ये मुंडे समर्थक गणेश तांदळे, अक्षय तिडकेंच्या बॅनरबाजीची चर्चा




बीड । प्रतिनिधी

मागील वर्षभरात झालेल्या राजकीय 'संघर्षा'नंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांचा वाढदिवस जवळ आला आहे. यानिमित्ताने बीड शहरात ठिकठिकाणी लावण्यात आलेल्या 'संघर्षयोद्धा' असा उल्लेख असलेल्या बॅनरमुळे चर्चांना उधाण आले आहे. ही बॅनरबाजी त्यांचे समर्थक असलेले युवा नेते गणेश तांदळे, अक्षय तिडके यांनी केली आहे.

मागील काही महिन्यांपासून प्रकृतीच्या ◀◀ पान ३ वर

# जयहिंद लोकचळवळचे श्रीकृष्ण नाईकवाडे यांचा सत्कार संपन्न



पिंपळवंडी । प्रतिनिधी

जयहिंद लोकचळवळ ही संघटना संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षण,आरोग्य, शेती,कृषी,उद्योजकता आणि युवक विकास या क्षेत्रात सक्रिय आहे.महाराष्ट्रातील युवकांचे प्रेरणास्थान असलेली आमदार सत्यजित तांबे यांच्या नेतृत्वाखाली या संघटनेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी श्रीकृष्ण नाईकवाडे यांचे नुकतीच निवड झाल्याने,प्रा.अशोक (तात्या) पवार व ॲड.गोकुळ पवार यांच्या वतीने श्रीकृष्ण नाईकवाडे यांचा सत्कार करण्यात आला,यावेळी श्रीकृष्ण नाईकवाडे यांचा मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# गुरुपौर्णिमेच्या दिवशी गुरुची कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे - केशव बादाडे

माजलगाव । प्रतिनिधी

**भारतीय जन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आदर्श गुरुकुल मध्ये दि.१० जुलै गुरुवार रोजी गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली.**

कार्यक्रमाची सुरुवात गुरुदेव श्री श्री रविशंकरजी यांच्या प्रतिमेचे पूजनाने झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे,मान्यवरांनी गुरुवंदन केले. विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर करून मान्यवरांचे स्वागत केले.विद्यार्थ्यांनी गुरुंबद्दल आपल्या भाषणातून कृतज्ञता व्यक्त केली.कार्यक्रमातील प्रमुख पाहुणे बालाजी बचाटे यांनी बोलताना असे सांगितले की,आपले आई वडील हे पहिले गुरु आहेत,तर प्रमुख पाहुणे श्रेयस बुरंगे यांनी गुरुप्रती कविता गायनातून गुरुची माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष केशव बादाडे यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व विशद करताना म्हणाले गुरु शिवाय जीवन व्यर्थ आहे. प्रत्येकाने आपल्या गुरुची कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. निसर्ग म्हणजे पृथ्वी,पाणी,अग्नी, वायू व आकाश या पाच तत्त्वांनी बनलेली आहे.निसर्ग हा आपला अनेक गुरु पैकी एक गुरु आहे. सर्व विद्यार्थ्यांनी गुरुजनांचे दर्शन घेऊन आदर भाव जपला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशराज बादाडे व शिवम शेजुळ यांनी केले तर प्रास्ताविक श्रीमती कोमल काळे मॅडम यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुमनबाई रणेर, सावित्री बादाडे, अंजली घाडगे नितीन शेंडगे यांनी परिश्रम घेतले.आभार गुरुकुलचे संचालक ओंकार बादाडेयांनी मानले.




# आ.नमिता मुंदडानी मांडला बुट्टेनाथ तलावाचा प्रश्न



अंबाजोगाई । प्रतिनिधी

**११ जुलै रोजी पावसाळी अधिवेशनात होत असलेल्या लक्षवेधी मध्ये केज मतदार संघाच्या कर्तव्यदक्ष आमदार नमिताताई मुंदडा यांनी केज, अंबाजोगाई, धारूर, यासाठी मांजरा धरणा तून पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न अधिवेशनात मांडला.**

त्याचबरोबर जायकवाडी धरणातून दोन ते तीन टी.एम. सी पाणी मिळावे याकरिता उपाय योजना करण्यात याव्यात व अंबाजोगाई शहरालगत असलेल्या बुट्ठेनाथ तलावाबाबत प्रश्न सभागृहात मांडता त्याला उत्तर देताना माननीय मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जायकवाडी धरणातून मांजरा धरणासाठी ९० किलोमीटर अंतर लिफ्ट द्वारे पाणी आणण्याचा प्रस्ताव सरकार समोर ठेवला व बुटे नात धरणासाठी काय उपाय करता येईल त्याचबरोबर केज मतदार संघातील पाझर तलाव याची माहिती घेऊन व त्याबाबत केज मतदार संघात बैठक घेण्याचे आश्वासन दिले

**२.३ टी एम सी पाणी मांजरा धरणाला जायकवाडी धरणातून मिळावे**

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना महिला आघाडीची बैठक

बीड । प्रतिनिधी

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनापक्षाचे मुख्यनेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार आणि खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सूचनेनुसार व विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलमताई गोऱ्हे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील शिवसेना महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांची बैठक आज शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात शिवसेना बीड जिल्ह्याचे जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि स्वप्नील गलधर यांच्या उपस्थितीत पार पडली. या वेळी मराठवाड्याच्या संपर्क प्रमुख अँड. संगिता चव्हाण यांची विशेष उपस्थिती होती.



या बैठकीत मार्गदर्शन करताना अँड. संगिता चव्हाण यांनी गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक हा संकल्प करून पक्षातील महिलांचे लक्षणीय योगदान आणि पक्षाने महिलांच्या समानकरिता केलेल्या कामाची माहिती दिली. या सोबत महाराष्ट्रात शिवसेनेला ताकद देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात पक्षाचा सहभाग कसा वाढवता येईल या बाबत मार्गदर्शन केले. या वेळी बोलताना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात प्रत्येक ठिकाणी पक्षाचा उमेदवार कसे उभे करता येतील आणि त्यांना निवडून आणण्यासाठी यंत्रणा कशी उभा होईलसाठी काम करण्याचे महत्व अधोरेखित केले. या प्रसंगी ◀◀ पान ३ वर




# साईनाथ मतिमंद विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

बीड । प्रतिनिधी

दिनांक १०/०७/२०२५ वार गुरुवार रोजी प्रयास फाऊंडेशन मुंबई यांच्या सहकार्याने साईनाथ मतिमंद निवासी विद्यालय नाथापुर येथे शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम मा. श्री. मदनराव चव्हाण यांच्या अध्यक्षते खाली पार पडला.या कार्यक्रमाचे मा. श्री. चंद्रकांत शेळके साहेब यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले.दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यामध्ये साहित्याची आवशकता भासते. त्यांना ◀◀ पान ३ वर

छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ (Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352

महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
- डोकेदुखी / अती चिंता व काळजी
➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता-पायात मुंग्या येणे)
- झोपेच्या समस्या
➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
- व्यसनाधिनता : (दारु, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
- बालकांच्या समस्या :
➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
- स्मृती भंग (विसरभोळेपणा)
- लैंगिक समस्या
➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
- स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या

नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
डॉ.जयश्री श्रीराम टेकाळे (M.B.B.S.) मो.7743990988
श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) मो.9075387638

# राष्ट्रवादी भवन ते अक्सा मस्जिद रस्त्याची दुरावस्था

## सरपतेसह नागरिकांचा १५ ऑगस्टला 'बेशरम आंदोलनाचा' इशारा



बीड । प्रतिनिधी

**शहेनशहा नगर परिसरातील राष्ट्रवादी भवन ते अक्सा मशीद चौकदरम्यानचा मुख्य रस्ता सध्या अत्यंत खराब स्थितीत असून, नागरिकांच्या दैनंदिन हालअपेष्टा आणि अपघाताच्या घटनांमुळे संताप उसळला आहे. प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने परिसरातील नागरिकांनी १५ ऑगस्ट २०२५ रोजी 'बेशरम झाड लावून' अनोखे निषेध आंदोलन छेडण्याचा निर्णय घेतला आहे.**

या मार्गावर अनेक खोल व मोठे खड्डे पडले असून, वाहनचालक आणि पादचारी नागरिकांसाठी हा रस्ता अपघाताचा सापळा ठरला आहे. विशेषतः या रस्त्यावरून अलहुदा उर्दू शाळा व मदरसामध्ये जाणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच वृद्ध, महिलावर्ग आणि रुग्णांनाही प्रवास करताना अत्यंत त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यात परिस्थिती अधिक बिकट होते, कारण खड्ड्यांत पाणी साचून अपघातांचे प्रमाण वाढते. प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष, नागरिकांचा रोष सामाजिक कार्यकर्ते मिलिंद सरपते यांनी या संदर्भात जिल्हाधिकारी बीड, नगर परिषद प्रशासन, खासदार आणि आमदार यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवले आहे. यामध्ये त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर १५ ऑगस्टपूर्वी रस्त्याच्या दुरुस्तीची ठोस पावले उचलली गेली नाहीत, तर नागरिक व कार्यकर्ते बेशरम झाड लावून प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध नोंदवतील.आंदोलनाची पुढील टप्प्यातील रणनीती: १. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नागरिक मतदानाचा बहिष्कार करतील.२. ''मुख्याधिकारी हटाव बीड शहर बचाव'' आंदोलनाची घोषणा करण्यात येईल. ३. जनआंदोलन अधिक तीव्र करून शासनाचा जागर करण्यात येईल.''हा लढा केवळ खड्ड्यांविरोधात नाही, तर प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात आहे,'' असे सरपते यांनी सांगितले. नागरिकांची संयमाची परीक्षाच सुरु असल्याचे त्यांनी नमूद केले. लोकशाहीत प्रश्न विचारण्याचे आणि उत्तरदायित्वाची मागणी करण्याचे नागरिकांना हक्क आहेत. पण जेव्हा प्रशासन हा आवाज ऐकण्यास तयार नसतो, तेव्हा रस्त्यावर उतरल्याशिवाय पर्याय राहत नाही, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली आहे.बीड शहरातील नागरी सुविधा आणि सार्वजनिक सुरक्षा यांकडे प्रशासन गांभीर्याने पाहील, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शनिवार, दि.१२ जुलै २०२५ । पान ७

# पुणे-मिरज रेल्वे दुहेरी मार्ग कार्यान्वित; शिंदवणे घाटमाथ्यावरून दुहेरी रेल्वे धावल्या

पुणे । प्रतिनिधी

**वाघापूर – महाराष्ट्र राज्यातील लक्षवेधी ठरलेला पुणे-मिरज मार्गावरील पुरंदर तालुक्याच्या जयाद्री खोर्‍यातील पुणे-कोल्हापूर मिरज दुहेरी रेल्वे मार्ग आता कार्यान्वित झाला असून शिंदवणे घाट माथ्यावरून केंद्रीय रेल्वे विभागाच्या परिश्रमातून उभारलेल्या दुहेरी मार्ग आणि दुहेरी बोगद्यातून आता रेल्वे धावू लागल्या आहेत. पुणे-सातारा १४५किमी मार्गाचे काम पूर्ण पूर्ण झाले आहे.**

मध्यरेल्वे विभागाला आव्हात्मक ठरलेला जयाद्री खोर्‍यातील शिंदवणे घाट माथ्यावरले कठीण काम पूर्ण करण्यात यश मिळाले असून हे काम भौगोलिक दृष्टीने कठीण होते; परंतु प्रगतीशील भारतीय उत्तम रेल्वे तंत्र आणि कौशल्य यामुळे हा मार्ग उभारला गेल्याचे प्रत्यक्षदर्शी आणि सामाजिक कार्यकर्ते प्रकाशराजे कुंजीर यांनी सांगितले.

या दुहेरी कारणामुळे रेल्वे गाड्या वेळेवर धावणार असून या मार्गांवरील जेजुरी-लोणंद मार्गांवरील वाढते औद्योगिककरण परिसरातील पर्यटन आणि तीर्थक्षेत्रे पाहता मालगाड्याची संख्या ही वाढविण्यात येत असल्याचे संबंधित रेल्वे अधिकार्‍यांनी सांगितले. राज्यातील तीर्थक्षेत्र आणि पर्यटन नगरी जेजुरी रेल्वे स्थानकाचा कायपालट होत असून लवकरच या स्थानकात सर्व लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांना थांबा आणि एखाद्या एक्स्प्रेस गाडीला जयाद्री अथवा मल्हार एक्स्प्रेस नाव मिळणार असून याबाबत जेजुरी रेल्वे प्रवासी संघटना, श्री मार्तंड देवसंस्थान, ग्रामस्थ भाविक पर्यटक उद्योजक आणि विविध पक्ष्याच्या कार्यकर्त्यांनी केंद्रीय रेल्वे मंत्रालयाशी निवेदनही दाखल केले असल्याचे जेजुरी भाजपा मंडल अध्यक्ष सचिन पेशवे यांनी सांगितले.

### १६ तीव्र वळणे, १३ छोटे पूल

रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी १७ जून २०२५ रोजी तपासणी केल्यानंतर दुहेरी मार्गांवर रेल्वे वाहतूक सुरू करण्यात आली. शिंदवणे, आंबळे दरम्यान काम पूर्ण करण्यासाठी १४० मीटर लांबीचा एक बोगदा बांधला तीव्र उतार असल्याने अचूक योजना अखण्यात आले. १३ भागात विभागलेला पूल बांधण्यात आला. हा पूल एक वर्षात पूर्ण करण्यात आला. १६ तीव्र वळणे आणि १३ छोटे पूल उभारण्यात आले.

शिंदवणे : घाट माथ्यावरून दुहेरी मार्ग आणि दुहेरी बोगद्यातून आता रेल्वे धावू लागल्या आहेत.

# खंडपीठासाठी जिल्ह्यातील वकिलांची बैठक लवकरच आंदोलनाची दिशा ठरवणार

पुणे । प्रतिनिधी

मुंबई उच्च न्यायालयचे खंडपीठ पुणे येथे सुरू व्हावे, यासाठी वकील पुन्हा आक्रमक झाले आहे. या संदर्भातील मागणीसाठी जिल्ह्यातील वकिलांची शिखर संघटना असलेल्या पुणे बार असोसिएशनने बुधवारी (दि. १६) बैठक बोलावली आहे. शिवाजीनगर येथील जिल्हा आणि सत्र न्यायालयातील अशोका हॉल समोरील हिरवळीवर ही बैठक होणार आहे. यामध्ये आंदोलनाची दिशा ठरविणारा निर्णय होण्याची शक्यता आहे.



पुणे आणि छत्रपती संभाजीनगर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ सुरू करण्याचा ठराव विधी मंडळात १९७८ साली झाला. त्यानुसार १९८१ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे खंडपीठ सुरू झाले. मात्र, अद्याप येथे सुरू झालेले नाही. या मागणीसाठी वकील आंदोलन करत आले आहेत. आता आंदोलनासाठी पुढाकार घेत पुणे बार असोसिएशनने बैठक बोलावली आहे.

खंडपीठासाठी जिल्हातील वकिलांची बैठक बोलावली आहे. सर्व तालुका आणि वकील संघटनांचे अध्यक्ष, प्रतिनिधी आणि वकील सहभागी होणार आहेत.

-ॲड. हेमंत झंजाड, अध्यक्ष- पुणे बार असोसिएशन

# बारामतीत लोपॅथी डॉक्टरांची बंदची हाक संपूर्ण युरोपमध्ये पाच लाख डॉक्टरची टंचाई

बारामती । प्रतिनिधी

राज्य शासनाने होमिओपॅथी डॉक्टरांबाबत घेतलेल्या निर्णयाविरोधात राज्य संघटनेच्या निर्णयानुसार शुक्रवार (दि.११) सकाळी ८ पासून २४ तासांसाठी बारामतीतील अत्यावश्यक सोडून सर्व वैद्यकीय सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत न्यायालयात याचिका असतानाही हा निर्णय घेतलाच कसा, असा सवाल इंडियन मेडिकल असोसिएशनने केला आहे.

बारामती आयएमएच्या कार्यकारिणीने निर्णयाविरोधात निषेध व्यक्त करीत बंदची हाक दिली आहे. राज्य शासनाच्या निर्णयाविरोधात (दि.११) सकाळी ८ ते (दि.१२) सकाळी ८ या वेळेत सर्व डॉक्टर्स वैद्यकीय सेवा बंद



### राज्य शासनाच्या निर्णयाला विरोध : आज निषेध करणार

ठेवतील. (अत्यावश्यक सेवा वगळून). (दि.१९) मुंबईत मोर्चा काढला जाणार असल्याचे बारामती शाखाध्यक्ष डॉ. संतोष घालमे, सचिव अमोल भंडारे, खजिनदार डॉ. सौरभ निंबाळकर यांनी सांगितले. यावेळी कार्यकारीणीतील डॉ. अशोक तांबे, डॉ. संजय पुरंदरे, डॉ. महेंद्र दोशी, डॉ. विक्रांत धोपाडे, डॉ. दिनेश ओस्वाल,डॉ. सौरभ मुथा, डॉ. विभावरी सोळुंके, डॉ. स्नेहलता पवार, डॉ. रेवती संत, डॉ. प्राजक्ता पुरंदरे, डॉ. दिपीका कोकणे, डॉ. शुभांगी वाघमोडे आदी उपस्थित होते.

# नव्या उपायुक्तांचा दणका; स्पेशल ड्राईव्हद्वारे कारवाई, स्थानिक पोलिसांना फुटला घाम

पुणे । प्रतिनिधी

**नवनियुक्त पोलिस उपायुक्तांनी पदभार स्विकारताच धडक मोहिम राबवत कारवाईचा वेगळा पॅटर्न सुरू केला आहे. हद्दीत अचानक 'स्पेशल ड्राईव्ह' राबवत परिमंडळ चारचे उपायुक्त सोमय मुंडे यांनी 'स्पा'च्या आडून चालणाऱ्या वेश्या व्यवसायावरच दंडूका फिरवला. तर दुसरीकडे हार्ट ऑफि सिटी असणाऱ्या मध्यभागात रात्री व दिवसा अशी मोहिम राबवून बेशिस्त वाहन चालकांसोबतच अवैध दारू विक्रेत्यांवर परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त कृषीकेश रावले यांनी कारवाई केली आहे. नवख्या अधिकाऱ्यांनी अचानक राबवलेल्या या विशेष मोहिमांमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. तर, स्थानिक पोलिसांना घाम फुटला आहे.**

आयपीएस सोमय मुंडे यांनी गडचिरोलीत नक्षलवाद्यांविरोधात उत्कृष्ट काम केले होते. त्यांना राष्ट्रपती शौर्यचक्रपदक देखील मिळाले. लातूर पोलिस अधीक्षक पदावरून त्यांची नुकतीच पुण्यात पोलिस उपायुक्त म्हणून बदली झाली. त्यांना परिमंडळ चारची



जबाबदारी देण्यात आली आहे. परिमंडळ चारचा पदभार स्विकारताच त्यांनी आपली छाप पाडण्यास सुरूवात केली आहे. अवघ्या काही दिवसात अवैध धंद्यांची गुप्त माहिती मिळवत त्यांनी स्पेशल ड्राईव्ह राबवला आहे.

एका दिवसात अचानक केलेल्या मोहिमेत त्यांनी तब्बल अवैध दारू विक्रीप्रकरणात ३५ गुन्हे नोंदवले आहेत. तर दोन हायप्रोफाईल वेश्या व्यवसाय देखील उघडकीस आणले. यामुळे गुन्हेगारांच्या मनात तर धडकी भरली आहेच पण स्थानिक पोलिसांना देखील घाम फुटला आहे.

सिंधुदर्गवरून आलेले आयपीएस कृषीकेश रावले यांना परिमंडळ एकची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांनीही अचानक मोहिम राबवत ७ गुन्हे अवैध दारू विक्रीप्रकरणात गुन्हे दाखल केले. सोबतच रात्रीच्या बेशिस्त वाहन चालकांना धडा शिकवत साडे पाचशे वाहनांचे चेकिंग केले. त्यातील १४१ वाहनांवर दंडात्मक कारवाई केली. तर ११ वाहने जप्त केली आहेत. तर एका ठिकाणी अमली पदार्थांची कारवाई केली आहे. नवनियुक्त उपायुक्तांनी केलेल्या या धडक मोहिमांमुळे सर्वांनाच घाम फुटला आहे.

### पर्वतीत दोन तरुणांवर टोळक्यांकडून हल्ला

राज्यात गुन्हेगारी वाढली असून, राज्यातील वेगवेगळ्या भागातून, खून, मारामाऱ्या, दरोडे, अपहरण अशा घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. पर्वती परिसरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी दोन तरुणांवर टोळक्यांकडून धारदार व लोखंडी हत्याराने हल्ला करून गंभीर जखमी केल्याच्या घटना घडल्या आहेत. किरकोळ कारणांवरून टोळक्याने दादागिरी करत मारहाण केली आहे. यामुळे सहकारनगर तसेच दत्तवाडी परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले होते.

# आपत्कालीन परिस्थितीसाठी पुणे जिल्हा प्रशासन सज्ज; दहा सॅटेलाईट फोनची केली व्यवस्था

पुणे । प्रतिनिधी

आपत्ती अथवा आणीबाणीच्या परिस्थितीत जिल्हा प्रशासनाचा संपर्क कायम राहावा यासाठी पुणे जिल्ह्यातील १० तहसील कार्यालयांमध्ये सॅटेलाईट फोन सज्ज ठेवण्यात आले आहेत. दुर्गम, दरडग्रस्त तसेच पूरप्रवण भागांमध्ये नेहमीच मोबाईल नेटवर्कची अडचण निर्माण होते. त्यामुळे दुर्घटना घडल्यावर माहिती वेळेवर प्रशासनाकडे पोहोचत नाही आणि मदत कार्यात विलंब होतो. ही परिस्थिती टाळण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने हा निर्णय घेतला आहे.



सॅटेलाईट फोन थेट उपग्रहांशी संपर्क साधून काम करतो. त्यामुळे कोणतेही मोबाईल नेटवर्क नसले तरी संवाद साधता येतो. सॅटेलाईट फोनवरून मोबाईल व लँडलाईन नंबरवर थेट संपर्क साधता येतो, ज्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देणे शक्य होते. पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड, मावळ, मुळशी, वेल्हा, भोर, पुरंदर, बारामती आणि दौड या १० तहसील कार्यालयांमध्ये सॅटेलाईट फोन उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

यामध्ये विशेषतः दौड आणि बारामती हे पूरप्रवण तालुके असून, मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसात या भागांतील अनेक गावांचा संपर्क तुटला होता. अशा वेळी सॅटेलाईट फोनमुळे जिल्हा प्रशासनाशी संपर्क राखणे शक्य होते. मान्सून काळात भटकंतीसाठी जुन्नर ते भोर या पट्ट्यात पर्यटकांची मोठी गर्दी असते. तसेच पालखी सोहळे, उत्सव, डोंगरदऱ्यांतील यात्रा आणि दरड कोसळण्याच्या घटनाही घडतात. या पार्श्वभूमीवर सदर तालुक्यांमध्ये सॅटेलाईट फोनची उपलब्धता अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

### काय आहे सॅटेलाईट फोन?

हा फोन जो थेट पृथ्वीभोवती फिरणाऱ्या उपग्रहांशी संवाद साधून कॉल किंवा मेसेज पाठवतो. सामान्य मोबाईल फोन मोबाइल टॉवर्सवर अवलंबून असतो. पण सॅटेलाईट फोनला मोबाईल टॉवरची गरज लागत नाही. या फोनची बॅटरी दीर्घकाळ टिकते त्याच कारण म्हणजे हा फोन सतत सिग्नल शोधत नाही. सामान्य फोनपेक्षा सॅटेलाईट फोन व सेवा दोन्ही महाग असते. मात्र, सॅटेलाईट फोन खरेदी व वापरासाठी शासनाची विशेष परवानगी आवश्यक असते.

# सूपमध्ये सापडलं झुरळ ! 'भिवंडी दरबार' हॉटेलचा घाणेरडा कारनामा

पुणे । प्रतिनिधी

**हॉटेलमध्ये कुटुंबासह जेवण करण्यासाठी गेलेल्या एका महिलेला दिलेल्या सूपमध्ये झुरळ सापडल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. वानवडी भागातील एका हॉटेलमध्ये ही घटना घडली आहे. याप्रकरणी वानवडी पोलिसांकडून संबंधित हॉटेलचे मालक, तसेच व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत अश्विनी रवी शिससाट (वय ३१, रा. दापोडी, मुंबई-पुणे रस्ता) यांनी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, 'भिवंडी दरबार' हॉटेलचे व्यवस्थापक अमन हुसेन शेख (वय २४, रा. आझादनगर, भिवंडी) याच्यासह मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिरसाट कुटुंबीय हे गेल्या महिन्यात १६ जून रोजी वानवडीतील 'भिवंडी दरबार हॉटेल'मध्ये रात्री जेवण करण्यासाठी गेले होते. त्यांनी जेवण मागविले. जेवण सुरू करण्यापूर्वी त्यांना सूप देण्यात आले. तेव्हा शिरसाट यांना दिलेल्या सूपमध्ये झुरळ आढळले.

या घटनेनंतर शिरसाट यांनी हॉटेल व्यवस्थापकासह कामगारांना जाब विचारला. तेव्हा त्यांनी सारवासारव केली. हॉटेल व्यवस्थापकाने भटारखान्यातील स्वच्छतेची कोणतीही दक्षता घेतली नाही, तसेच ग्राहकांच्या आरोग्याला हानी होईल, असे खाद्यपदार्थ दिल्याचे शिसराट यांनी फिर्यादीत म्हटले आहे.याप्रकरणी भारतीय न्यायसंहिता २७५ अन्वये (ग्राहकांना भेसळयुक्त खाद्यपदार्थ विक्री करणे) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार कुंभार तपास करत आहेत

# विष प्राशन करून जोडप्याने संपवलं आयुष्य; खडकवासला परिसरातील धक्कादायक प्रकार

पुणे – मांजरीतील महादेव नगरमधील १६ वर्षीय मुलगी आणि एका तरुणाने खडकवासला धरणाजवळ विषारी औषध सेवन करून आत्महत्या केली. प्राथमिक तपासात दोघांत प्रेमसंबंध आणि त्याला मुलीच्या कुटुंबियांचा विरोध असल्याने ही घटना घडल्याचा अंदाज वानवडी पोलिसांनी वर्तविला आहे.

गुरुवारी रात्री फिर्यादी अपूर्वा गुरसाळे (रा. महादेव नगर, मांजरी) यांनी वानवडी ठाण्यात आपली बहिण अक्षरा बेपत्ता असल्याची तक्रार दिले. त्याने बहिणीला फिजिक्सवाला क्लासेस, ९३ अव्हेन्यू चौक येथे सोडले होते. वर्ग संपल्यानंतर ती घरी परतली नाही. शोधाशोध करूनही ती सापडली नाही म्हणून रात्री दहाच्या सुमारास अपूर्वाने ठाण्यात तक्रार दाखल केली.

याचा तपास पोलीस उपनिरीक्षक लोंढे करीत होते. तक्रारीनुसार संतोष बाळासाहेब कळसाईत (रा. महादेव नगर, मांजरी; मूळ ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) याच्यावर संशय घेतला होता. तो आणि अक्षरा दोघे एकत्र असल्याच्या शक्यतेतून शोध सुरू झाला आज (शुक्रवार) सकाळपासून संशयितांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू होता.मात्र, त्याचा मोबाईल बंद होता. त्याच्या मूळ गावी सरपंचाशी संपर्क साधला तेव्हा तो तेथे नसल्याची माहिती मिळाली. दरम्यान, उत्तम नगर पोलिसांना खडकवासला धरणाजवळ एका तरुण-तरुणीने विषारी औषध सेवन करून आत्महत्या केल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतल्यावर ते अक्षरा व संतोष असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार वानवडी पोलिसांना खबर देण्यात आली.

अक्षरा अकरावीला असून तिची आई शिक्षिका तर वडिल एसटी चालक आहेत. तरुणाचे वडिल मोल मजुरी करत असून तो नोकरीच्या शोधात होता. दोघेही एकाच इमारतीत राहत असल्याने गेल्या दोन-तीन महिन्यांपासून त्यांच्यात प्रेमसंबंध होते. मुलीच्या घरच्यांना याची कल्पना होती आणि त्यांचा याला विरोध होता. यामुळेच तणावाखाली येऊन त्यांनी आत्महत्या केली असावी.

– सत्यजित आदमाने. (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वानवडी पोलीस ठाणे)

# आयटीआय बळकटीकरणासाठी १२० कोटींची गुंतवणूक; तरुणांना जागतिक दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण – वैभव सोलणकर

बारामती । प्रतिनिधी

महाराष्ट्राला कौशल्यविकासाचे आंतरराष्ट्रीय केंद्र बनवण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. मुंबई, पुणे, बारामती, नाशिक, सिंधुदुर्ग आणि नागपूर येथील निवडक सहा औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे (आयटीआय) आधुनिकीकरण करण्यासाठी १२० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. यामुळे दरवर्षी ५ ते ७ हजार विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण मिळणार असून, त्यांना देश-विदेशात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत, अशी माहिती माळेगाव येथील अनंतराव पवार औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे व्यवस्थापन परिषद सदस्य वैभव सोलणकर यांनी दिली.



राज्य सरकारच्या कौशल्यविकास आणि बंदरे विभागाने विदेशी संस्था अटल सोल्युशन्स इंटरनॅशनल यांच्यासोबत विधान भवनात सामंजस्य करार केला आहे. या कराराद्वारे बंदर आणि लॉजिस्टिक क्षेत्रात कुशल मनुष्यबळ तयार करण्यावर भर दिला जाणार आहे. या कराराच्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, कौशल्यविकासमंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री नितेश राणे, अटल सोल्युशन्स इंटरनॅशनलचे व्यवस्थापकीय संचालक एडविन सिएसवर्दा, रुरल एनहान्सर ग्रुपचे अंबर आयदे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या अप्पर मुख्य सचिव, वाढवण बंदर विकास कंपनी लिमिटेडचे संचालक, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालकांसह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या करारामुळे आयटीआय संस्थांचे आधुनिकीकरण होऊन विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण मिळेल. यातून तरुणांना बंदर, लॉजिस्टिक आणि संबंधित क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. खासगी आणि सार्वजनिक भागीदारीच्या माध्यमातून हा उपक्रम महाराष्ट्राला कौशल्यविकास क्षेत्रात अग्रेसर ठरेल, असे सोलणकर यांनी सांगितले. सरकारच्या या दूरदृष्टीपूर्ण निर्णयाचे मी मनःपूर्वक स्वागत करतो. आयटीआय विद्यार्थ्यांना आतापर्यंत असे जागतिक व्यासपीठ मिळाले नव्हते. राज्य सरकारच्या या प्रयत्नांमुळे तरुणांचे भविष्य उज्ज्वल होईल, असे वैभव सोलणकर, शासन नियुक्त सदस्य, अनंतराव पवार औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माळेगाव यांनी नमूद केले.